POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२६३ ● मुंबई, रविवार, २६ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीवरुन राजकारण तापलं, अखेर मुख्यमंत्री फडणवीसांकडून भूमिका जाहीर

मुंबई, महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय राजकीय मुद्दा बनला आहे. यावरुन राजकीय वादविवाद सुरु झाले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या विषयात आक्रमक भूमिका घेत इशारा दिला आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय घेतला. येत्या 1 मे पासून या आदेशाची अंमलबजावणी सुरु होणार आहे. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना ग्राहकांना मराठी भाषेत बोलावं लागेल. मराठी लिहिता, वाचता न येणाऱ्या रिक्षा, टॅक्सी चालकांचे परवाने येत्या 1 मे पासून रद्द करण्याचा इशारा सरनाईक यांनी दिला आहे. मराठी भाषा सक्तीची करण्याच्या या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात 4 मे पासून 15 लाख रिक्षाचालकांनी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. त्यावर मनसे नेत संदीप देशपांडे यांनी ह्लतुमची ताकद आम्हाला 4 तारखेला दाखवा. या भैय्या लोकांना महाराष्ट्र आणि मुंबईतून बाहेर पाठवण्याची वेळ आली आहेह्व असं म्हटलं आहे. आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या मुद्यावर सरकारची भूमिका मांडली आहे. मुंबई, महाराष्ट्रात मराठीचा आग्रह चुकीचा नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ह्लपहिली गोष्ट म्हणजे मुंबई, महाराष्ट्रात मराठीचा आग्रह होणं, मराठीला प्राथमिकता द्या सांगणं चुकीचं नाही. सरकारची भूमिका काय असेल, तर वाद होऊ नये ही आमची भूमिका आहे. ज्यांना टॅक्सी, रिक्षा चालकांना मराठी येत नाही, त्यांना मराठी शिकवूह्व असं फडणवीस म्हणाले.

**ते जास्त शिकलेले लोक नाहीत**

"रिक्षा आणि टॅक्सी चालकांकडून मराठी बोलण्याची अपेक्षा केली पाहिजे. त्यांनी मराठीतून संवाद साधला पाहिजे. पण त्यांची चाचणी घेऊ नका, कारण ते जास्त शिकलेले लोक नाहीत. जास्त शिकलेले लोक रिक्षा, टॅक्सी चालवणार का?" असा सवाल संजय निरुपम यांनी विचारला. "कॉर्पोरेटमध्ये काम करणारे रिलायन्स, बिर्ला यांच्या कंपन्यांमध्ये काम करणारे सगळे लोक मराठीत बोलतात का?. झोमॅटो, स्विगीवरुन पार्सल घेऊन येणारे मराठीत बोलतात का?" असे प्रश्न संजय निरुपम यांनी विचारले आहेत.

## 'मराठी भाषेवरुन रिक्षा, टॅक्सीचं लायसन्स रद्द होणार नाही' प्रताप सरनाईकांनी स्पष्ट केली भूमिका, मग सक्ती कशी होणार?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यात मराठीच्या मुद्द्यावरून चांगलाच वाद पेटला आहे. 1 मेपासून रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र यानंतर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांची मुजोरी पाहायला मिळालीय. तर दुसरीकडे अनेकजण मराठी शिकण्यासाठी इच्छुक आहेत. काही ठिकाणी रिक्षाचालकांनी परतीची वाट धरली आहे. दरम्यान एका विशेष मुलाखतीत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठी भाषेवरुन परवाना रद्द होणार नाही असं स्पष्ट करत नेमकी भूमिका सांगितली.

चालकांची परीक्षा कशी घेतली जाणार? याबद्दल विचारलं असता ते म्हणाले, "आम्ही परीक्षा वैगैरे घेणार नाही. आमच्याकडे काही तक्रारी आल्या आहेत की, परमिट, परवाना, बॅच दिले जात असताना कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. 15 वर्ष वास्तव्याची अट असतानाही परराज्यातून येतो, सहा महिन्यापूर्वी, एक महिन्यापूर्वी येतो, त्याला परमिट, बॅच सगळं कसं मिळतं याची चौकशी होणार. खोटी कागदपत्रं सादर केली असतील तर त्यांची पोलीस तक्रार करणार. लायसन्स, बॅच दिले असतील तर संबंधित आरटीओच्या कर्मचाऱ्यांवर पण कारवाई करणार. यांनाही दिलेलं लायसन्स, बॅच रद्द करणार".

**'मराठीवरुन परवाना रद्द करण्याची आमची भूमिका नाही'**



"तुम्हाला प्राथमिक मराठी बोलता येतं का....येत नसेल तर आम्ही शिकवू. आमची शिकवायची मानसिकता आहे. मराठीवरुन परवाना रद्द करण्याची आमची भूमिका नाही. कागदपत्रं खोटी असतील तर कारवाई होणार," असं त्यांनी स्पष्ट केलं. पुढे ते म्हणाले, "मराठी शिकवू, शिकवण्यासाठी मदुत देऊ. त्यातही जर नाही बोलला तर आम्ही कारवाई करु. पण शेवटी शिकावं लागेल".

**दुटप्पीपणा, मुजोरीबद्दल ती शिक्षा देऊ शकतो**

"मराठी राजभाषा असून ती शिकावी लागेल. संधी देऊनही तुम्ही शिकलं नाही, मुजोरी दाखवली तर कारवाई करण्याचे अधिकार आमच्याकडे आहेत. परिवहन खात्याचा मंत्री, आरटीओचा अधिकारी त्याच्या दुटप्पीपणा, मुजोरीबद्दल ती शिक्षा देऊ शकतो," असंही त्यांनी स्पष्ट केलं.

ग्रामीण भागातील आपल्या लोकांनी रिक्षातून, टॅक्सीतून जायचं असेल किंवा ओला, उबरमधन जायचं असेल आणि हिंदीचं ज्ञान नसेल तर किमान संवाद सादताना चालकाला समजलं पाहिजे. बऱ्याचदा चालक अरेरावीने बोलत असल्याची तक्रार येते. भाषिक वाद निर्माण होऊन पोलिसांपर्यंत प्रकरण जातात. मराठी शिका आणि प्रवाशांशी मराठीत बोला. यामुळे जास्त मराठी प्रवासी येतील आणि रोजगार वाढेल असंही त्यांनी सांगितलं.

**रितेश आणि जेनेलियाने किती मानधन घेतलं?**

रितेश देशमुख हे मराठीसह हिंदीतील आघाडीचे अभिनेते आहेत. त्यांची विशेष ओळख आहे. वडिलांसोबतच्या त्यांच्या एसटीच्या आठवणी आहेत. तसेच रितेश यांचे वडील विलासराव देशमुखदेखील परिवहन मंत्री होते, असे सरनाईकांनी सांगितले. मी वडिलांसोबत पहिला प्रवास एसटीने केला होता, अशी आठवण रितेशने आपल्याया सांगितल्याचे सरनाईक म्हणाले. मी मानधनाबद्दल विचारल तेव्हा एक रुपयाही नको, असे ते म्हणाले. ब्रॅण्ड एंम्बेसिडर असल्याने आम्ही पैसे देऊ असे म्हटल्यावर मी ते दान करेन असे सरनाईक म्हणाले.

## मिरा-भाईंदर, वसई-विरारमध्ये जनगणना तयारीला सुरुवात

■भाईंदर। प्रतिनिधी,

भारत सरकारच्या गृह मंत्रालय आणि जनगणना कार्य संचालनालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, मिरा –भाईंदर आणि वसई–विरार महापालिका क्षेत्रात जनगणना २०२७ या महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमाची तयारी सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, ही जनगणना देशातील पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना असणार आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यासाठी पालिकांनी जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे. जनगणना २०२७ ही देशाची १६ वी तर स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना ठरणार असून, ती पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबवली जाणार आहे.डिजिटल युगाचे पाऊल ओळखून यंदा नागरिकांना आपली माहिती स्वतःहून भरण्याची म्हणजेच स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्वगणनेचा कालावधी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ असा आहे. नागरिक http://se.census.gov.in या पोर्टलवर जाऊन आपली माहिती नोंदवू शकतात. स्वगणनेचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत महापालिकेचे अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक नागरिकांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित करतील. तर वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत जनगणना २०२७ संदर्भात सविस्तर माहिती देत लोकप्रतिनिधींनी नागरिकांना स्वगणना प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन प्रशासनाने केले. उप–आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी हर्षला राणे यांनी जनगणनेचे महत्त्व, प्रक्रिया आणि कालावधी याबाबत माहिती दिली.वसई–विरार महापालिका क्षेत्रात जनगणना कायार्साठी एक मास्टर ट्रेनर, ९१ क्षेत्रीय प्रशिक्षक, ६५१ पर्यवेक्षक आणि ४२९८ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधितांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण दिले जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. जनगणना यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. तसेच लोकप्रतिनिधींनी आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना स्वगणना प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले.



## वशिलेबाजी चालणार नाही! तुळजाभवानी मंदिरात नियमभंग पूजा, पुजाऱ्यावर गुन्हा दाखल

■धाराशिव। प्रतिनिधी,

तुळजाभवानी मंदिरातील सिंहासन पूजेच्या ऑनलाइन पास व्यवस्थेला चुकवत एका पुजाऱ्याने सहा जणांच्या कुटुंबासह बेकायदेशीरपणे पूजा केल्याचा प्रकार समोर आला आहे. दर्शनासाठी जात असल्याचे सांगून संबंधितांनी नाना–नाणी गेट मार्गे मंदिरात प्रवेश केला. सोबत पुजारी असल्याने मंदिराच्या खासगी सुरक्षा रक्षकांनी त्यांना अडवले नाही. या संधीचा गैरफायदा घेत संबंधित पुजाऱ्याने सकाळी पहिलीच शासनमान्य सिंहासन पूजा केल्याचे उघड झाले आहे.

दत्त मंदिराजवळील गेटमधून सिंहासन पूजेसाठी भाविकांना सोडले जाते. त्या पद्धतीनुसार सकाळपासून पूजांचा क्रम सुरू असताना सहाव्या सिंहासन पूजेच्या वेळी नोंदी तपासताना विसंगती आढळली. ऑनलाइन पास नोंद नसतानाही एक पूजा झाल्याचे दिसून आले. यानंतर मंदिर प्रशासनाने तपास सुरू केला असता, दर्शनाच्या नावाखाली प्रवेश करून पुजाऱ्याच्या मदतीने पूजा केल्याचा प्रकार उघड झाला.

अभी कुतवळ असे संबंधित पुजाऱ्याचे नाव असून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांना पाच वर्षांसाठी मंदिर प्रवेशबंदी करण्यात आली आहे. सुरक्षा रक्षकांना गाफील ठेवून हा प्रकार करण्यात आल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले.

**सुरक्षा यंत्रणा अलर्ट**

दरम्यान, या घटनेनंतर मंदिर प्रशासनाने सुरक्षा यंत्रणा सतर्क केली. सर्व प्रवेशद्वारांवर पास तपासणी सक्तीची करण्यात आली. पुजाऱ्यांसोबत येणाऱ्या भाविकांची स्वतंत्र नोंद सुरू झाली. सीसीटीव्ही नियंत्रण कक्षातून थेट देखरेख वाढवण्यात आली. दत्त मंदिर गेटवर अतिरिक्त सुरक्षा तैनात करून प्रत्येक सिंहासन पूजेपूर्वी पडताळणी अनिवार्य करण्यात आली.



**सिंहासन पूजेचा प्रकार कसा आला समोर?**

सकाळपासून दर दहा मिनिटांनी सिंहासन पूजा सुरू होते. सहाव्या पूजेच्यावेळी नोंदवही आणि ऑनलाइन पास यांची पडताळणी करताना एक पूजा नोंद नसल्याचे दिसून आले. दत्त मंदिराजवळील गेटमधून प्रवेश झाल्याचा संशय निर्माण झाला. तपासात दर्शनाच्या नावाखाली सहा जणांनी पुजाऱ्यासह पूजा केल्याचा प्रकार उघड झाला. प्रशासनाने सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी ओळखल्या असून प्रवेशद्वारांवरील तपासणी अधिक कडक करण्यात आली आहे.

तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी राज्यासह देशभरातून भाविक येत असतात. भाविकांचं देवीसोबत खूप भावनिक नातं असतं. ते देवीच्या दर्शनासाठी आतूर झालेले असतात. देवीच्या चरणी नतमस्तक व्हावं यासाठी ते झटत असतात. ही लाखो भाविकांची श्रद्धा, आस्था आणि विश्वास आहे. त्यामुळे प्रत्येक भाविकाला समान न्याय हक्क मिळायला हवा. देवीसाठी सर्वच भाविक हे सारखे असतात. कुणीही देवीसाठी व्हीआयपी नसतो. त्यामुळे मंदिरातील पुजारी किंवा इतर कुणाच्या मदतीने थेट मंदिरात प्रवेश मिळवून पूजा करण्याच्या घटनेवर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. दरम्यान, या प्रकरणी मंदिर प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचं आणि भूमिकेचं कौतुक होत आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये डान्स बारवर धाड

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा –भाईंदरमध्ये नवघर पोलीस ठाणे हद्दीतील 'अण्णा पॅलेस डान्सबार' वर काशीमिरा गुन्हे प्रकटीकरण, कक्ष–१ यांनी कारवाई करत भिंतींच्या कप्प्यात बांधलेली गुप्त खोली (कॅव्हिटी ) शोधत त्यातून १३ मुलींची सुटका केली आहे. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे प्रकटीकरण कक्ष–१, काशिमिराचे पोलीस निरीक्षक सुशिलकुमार शिंदे यांना गुप्त मिळालेल्या माहितीवरून २३ एप्रिल रोजीच्या मध्यरात्री ऑर्केस्ट्रा बारवर छापा टाकण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी एक दीड तासांनी कॅव्हिटीतून सहा मुलींना बाहेर काढून एकूण १३ मुलींची





सुटका करण्यात आली आहे. सदर छाप्यादरम्यान बारमधील स्टेजवर ४ महिला सिंगर्स या तोकडे कपडे परिधान करून अश्लिल अंगविक्षेप करीत असताना मिळून आल्या आहेत. तसेच, बारच्या टेरेसवर उभारण्यात आलेल्या मेकअप रूममध्ये ३ मुली आढळून आल्या आहेत. त्यानंतर, बारच्या इमारतीमधील सर्व खोल्यांचे निरीक्षण करीत असताना बारमधील बाथरूम व जिन्याशेजारील जागा यामध्ये लावण्यात आलेल्या टाईल्समध्ये फरक असल्याचे दिसून आले. अरूंद खोली (कॅव्हिटी) तयार केली असण्याची शक्यता वाटल्याने त्याबाबत अधिक तपास करता सदर ठिकाणी भिंतीला टाईल्स लावून त्याच्याआड इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उघडणारा जाड लोखंडी दरवाजा बसवून आतमध्ये ८ फूट बाय २.५ फूट लांबी रुंदीची अरुंद पोकळी (कॅव्हिटी) बनविली असल्याचे आढळून आले. सदर कॅव्हिटीमध्ये ६ मुली दाटीवाटीने गुदमरल्या अवस्थेत उभ्या असताना मिळून आल्या आहेत. याप्रकरणी १३ आरोपींविरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, बारमध्ये मिळून आलेल्या एकूण १३ मुलींची तेथून सुटका करण्यात आली आहे.

## इस्तंबूलमध्ये भारतीय ड्रग लॉर्ड सलीम डोला जेरबंद! दाऊद कनेक्शनमुळे मोठ्या खुलाशांची शक्यता



■सोलापूर। प्रतिनिधी,

आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी नेटवर्कमधील एक प्रमुख सूत्रधार आणि कुख्यात भारतीय ड्रग लॉर्ड सलीम डोला याला तुर्कीच्या सुरक्षा यंत्रणांनी इस्तंबूलमध्ये एका मोठ्या कारवाईत अटक केली आहे. भारतीय सुरक्षा यंत्रणांनीही त्याच्या अटकेला दुजोरा दिला आहे. ही कारवाई गुन्हेगारी जग आणि अमली पदार्थ नेटवर्कविरुद्ध एक मोठे यश मानली जात आहे.

सूत्रांनुसार, सलीम डोला बऱ्याच काळापासून अनेक देशांशी संबंध असलेले एक जागतिक सिंथेटिक ड्रग नेटवर्क चालवत आहे. तपास यंत्रणांचा दावा आहे की, त्याच्या नेटवर्कचे संबंध भारताचा मोस्ट वॉन्टेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या टोळीशी देखील आहेत.

**ड्रग्ज सिंडिकेट दुबईतून कार्यरत होते :** कुख्यात ड्रग्ज तस्कर सलीम डोला हा दाऊद इब्राहिमचा जवळचा साथीदार मानला जातो. सुरुवातीला मुंबईत सक्रिय असलेला तो, नंतर संपूर्ण ड्रग्ज सिंडिकेट चालवण्यासाठी दुबईला गेला. सुरक्षा यंत्रणांच्या मते, भारतात ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या एका प्रमुख मार्गावर त्याचे नियंत्रण होते.

ऑक्टोबर २०२५ मध्ये, मुंबई गुन्हे शाखेने त्याचा प्रमुख साथीदार, मोहम्मद सलीम सोहेल शेख याला दुबईहून भारतात प्रत्यार्पित केले. त्यानंतर, नोव्हेंबर २०२५ मध्ये, मुंबई पोलिसांनी सलीम डोलाचा मुलगा, ताहीर डोला आणि कुटुंबातील इतर चार सदस्यांना दुबईतून अटक केली.

**रेड कॉर्नर नोटीस आणि बक्षीस जाहीर :** नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (एनसीबी) सलीम डोलावर १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याच्याविरोधात रेड कॉर्नर नोटीस (आरसीएन) देखील जारी करण्यात आली होती. मुंबई पोलिसांनीही त्याला पाहिजे असलेला गुन्हेगार म्हणून घोषित केले होते. सुरक्षा यंत्रणांच्या मते, सलीम डोलाकडे सौदी अरेबियाचा पासपोर्ट आहे. त्याला ज्या देशातून अटक करण्यात आली आहे, तिथून भारतात थेट प्रत्यार्पण किंवा हस्तांतरण सध्या शक्य नाही. त्यामुळे, भारतीय यंत्रणा त्याला भारतात आणण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीमार्फत आंतरराष्ट्रीय प्रयत्न करत आहेत.

**दाऊद नेटवर्कशी जुना संबंध :** अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सलीम डोलाचे वडील मुंबईत दाऊद इब्राहिमसोबत बराच काळ काम करत होते. सलीम डोला स्वतः नंतर दुबईला गेला आणि 'डी–कंपनी'साठी काम करत अमली पदार्थांच्या व्यापारात खोलवर गुंतला.

**महत्त्वपूर्ण खुलासे होण्याची शक्यता :** सुरक्षा यंत्रणांना असे वाटते की सलीम डोलाच्या अटकेमुळे आंतरराष्ट्रीय ड्रग्ज नेटवर्क, हवाला चॅनेल आणि गुन्हेगारी जगताशी असलेल्या संबंधांविषयी महत्त्वपूर्ण खुलासे होऊ शकतात. येत्या काही दिवसांत त्याच्या चौकशीतून ड्रग्ज सिंडिकेटची संपूर्ण रचना उघड होण्याची शक्यता आहे.

ही अटक भारत आणि परदेशी गुप्तचर संस्थांमधील वाढत्या सहकार्याचे लक्षण म्हणूनही पाहिली जात आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीविरुद्धच्या लढ्याला नवी ताकद मिळण्याची शक्यता आहे.

## डोंबिवली हत्याकांडाचा मास्टरमाइंड अडीच वर्षांनी जेरबंद! वेश बदलून नांदेडच्या शेतात करत होता काम, पोलिसांनी अखेर आवळल्या मुसक्या



२०२३ मधील डोंबिवली येथील एका हत्याप्रकरणातील मुख्य आरोपीला, अडीच वर्षांच्या कसून शोधमोहिमेनंतर पोलिसांनी अटक केली. नांदेडमध्ये शेतमजूर म्हणून वेशांतर करून राहत असलेल्या दीपक करकाडे याला, पाळत ठेवून आणि एका गुप्त मोहिमेद्वारे जेरबंद करण्यात आले. एका किरकोळ वादातून सोमनाथ शिंदे याची हत्या केल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवली हत्याकांडाचा मास्टरामाइंड अडीच वर्षांनी जेरबंद करण्यात आला. वेश बदलून नांदेडच्या शेतात काम करत होता, मात्र पोलिसांनी डोकं लावून वेशांतर करत फिल्मी स्टाइलने कारवाई करत मुसक्या आवळल्या.

डोंबिवलीच्या विष्णुनगर पोलीस ठाणे परिसरात 27 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या सोमनाथ बाबू शिंदे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी दीपक करकडे (वय 28) याचा पोलिसांनी नांदेड जिल्ह्यातील वाटेगाव येथे शोध घेतला. तब्बल अडीच वर्षानंतर पोलिसांनी तपास सुरु ठेवत, आरोपीला अटक केली.

**नेमकी घटना काय?**

नोव्हेंबर 2023 मध्ये देवीचापाडा येथील स्मशानभूमीजवळ खाडीच्या किनारी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. डोक्यावर आणि तोंडावर दगडाने हल्ला करत आरोपीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याची माहिती समोर आली. संबंधित प्रकरणातील सीसीटीव्ही आणि गुप्त माहितीच्या आधारे मृताची ओळख सोमनाथ शिंदे असल्याचे सांगण्यात येते.

**तरुणावर दगडाने हल्ला करत ठेचून ठार मारलं**

संबंधित घटनेनंतर पोलिसांनी विलन ठावरे आणि योगेश डोंगरे यांच्या देखील याआधी मुसक्या आवळल्या होत्या. त्यांच्या चौकशीनंतर किरकोळ वादातून दीपक करकडे यांच्या मदतीने सोमनाथ शिंदे यांच्यावर दगडाने हल्ला करत ठेचून ठार मारल्याचा कबुलीनामा दिला. मात्र, संबंधित घटनेनंतर मुख्य आरोपी दीपक करकडे हा पोलिसांना हातावर तुरी देऊन फरार झाल्याची माहिती समोर आली.

दीपक करकडेने मोबाईल सिमकार्ड आणि वास्तव्याचे ठिकाण बदलले होते. विष्णुनगर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि मोबाईल लोकेशनच्या मदतीने माग काढला. आरोपी हा नांदेडमध्ये असल्याची खात्री पटल्यानंतर 24 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी पोलीस पथकाने वाटेगाव येथे वेशांतर करून सापळा रचत डोकं लढवून त्याला ताब्यात घेतले. संबंधित प्रकरणानंतर अडीच वर्षानंतर गुन्हेगाराला कायद्याच्या चौकटीत बसवले. यामुळे आता पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होऊ लागलं आहे.

## एकाच दिवशी 3 जणांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला... शहरात खळबळ

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकच्या पंचवटी परिसरात गेल्या २४ तासांत वेगवेगळ्या घटनांत कोयत्याने हल्ला करून तिघांना गंभीर जखमी केल्याच्या तीन घटना घडल्या आहेत. या घटनांनी शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील पंचवटी, आडगाव आणि म्हसरूळ या भागांत घडलेल्या या घटनांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहे तर पुढील तपास सुरू आहे.

म्हसरूळ परिसरात नवनाथ बिंदे (३०) यांच्यावर जुन्या वादातून हल्ला करण्यात आला. ईश्वर पवार, दगड्या गुंबाडे आणि यश पवार यांनी संगनमत करून बिंदे यांना अडवले. यावेळी कोयत्याने वार करत तसेच दगडाने मारहाण करून त्यांना जखमी करण्यात आले. तीन्ही घटनांमुळे पंचवटी परिसरात कायदा–सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, पोलिसांनी गस्त वाढवून आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील अशीच एक घटना घडली. जत्रा हॉटेल परिसरात जुन्या वादातून रिक्षाचालक हरिभाऊ खंडाळे (४१) यांच्यावर प्रेम व आदित्य खलसे या संशयितांनी हल्ला केला. रिक्षा वळवत असताना दोघांनी त्यांना अडवून शिवीगाळ करत कोयत्याने डोक्यावर वार केल्याने ते गंभीर जखमी झाले.

तर फुलेनगर परिसरात तडीपार असलेल्या संशयिताने मजूर तरुणावर हल्ला केल्याची घटना घडली. भरत कुंदे (२०) याला "मी तडीपार आहे" अशी धमकी देत अमन सैय्यद याने धारदार शस्त्राने मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या शुभम दिक्षीत यालाही मारहाण करण्यात आली. संबंधित आरोपीवर यापूर्वीही गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

दरम्यान या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित आरोपींवर तातडीने कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.






संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आंदोलने, मोर्चे आणि सर्वसामान्य!



ज्यावेळी प्रश्न, समस्या यांची उत्तरे मिळत नाहीत, तेव्हा मोर्चे काढले जातात आणि आंदोलने केली जातात. त्यामुळे हे प्रकार म्हणजे लोकशाहीचा जणू अविभाज्य भागच झाले आहेत. मुंबई म्हटली की, आंदोलने, मोर्चे आणि पदयात्रा हे समीकरण ओघाने येते; कारण प्रतिदिन कुठे ना कुठे अशा प्रकारांचे आयोजन मुंबईत केले जाते. जो उठतो, तो आंदोलन करतो. मुंबई हे आंदोलनकर्त्यांचे हक्काचे ठिकाण झाले आहे. अर्थात या आंदोलनांचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर किती आणि कसा होतो, याचा विचार मात्र कुणीच करत नाही. याची प्रचीती नुकतीच मुंबईत २१ एप्रिल या दिवशी 'नारी शक्ती वंदन' विधेयकाच्या समर्थनार्थ काढण्यात आलेल्या 'जनआक्रोश महिला पदयात्रे'च्या वेळी आली. या पदयात्रेमुळे प्रचंड मोठी वाहतूककोंडी होऊन तिचा फटका सामान्यांना बसला. त्यातील एका महिलेने थेट मंत्रीमहोदयांना 'इथून चालते व्हा!' असे म्हटले आणि त्यानंतर ते प्रकरण चांगलेच गाजले. त्या महिलेची बोलण्याची भाषा असभ्य होती. त्यामुळे तिचे समर्थन तर निश्चितच करता येणार नाही; पण बोलण्यामागील भावना, अस्वस्थता, रोष यांचा विचार व्हायला हवा. त्या संतापाचा किंवा असंतोषाचा उद्रेक का झाला? हे पाहिले पाहिजे. लोकशाहीने प्रत्येकाला आंदोलनांचा अधिकार दिलेला आहे; पण तो शांततामय आणि शिस्तबद्ध मार्गाने! सार्वजनिक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात गर्दी निर्माण करून वाहतूक ठप्प करणे, तसेच रुग्णवाहिका, शालेय वाहने आणि नोकरदार वर्ग यांना अडथळा निर्माण करणे, हे लोकशाहीच्या तत्त्वांमध्ये बसते का? याचाही विचार करायला हवा. मुंबईसारख्या शहरात, नव्हे राजधानीत कोणताही मोठा मोर्चा किंवा कार्यक्रम आयोजित करतांना वाहतूक व्यवस्थापन हे प्राथमिक दायित्व असते. या अंतर्गत पर्यायी मार्गांची आखणी करणे, वाहतुकीचे योग्य नियोजन करणे, सार्वजनिक वाहतुकीची पूर्वसूचना देणे याही गोष्टी येतात. हे न केल्यास वरील स्वरूपाच्या घटना घडतातच! त्यामुळे केवळ आंदोलनकर्त्यांकडे बोट न दाखवता प्रशासन आणि पोलीस यांनीही त्यांचे दायित्व पार पाडायला हवे. या दायित्वाच्या अभावामुळेच मुंबईतील पदयात्रेचे नियोजन पुरते कोलमडून गेल्याचे पहायला मिळाले. या घटनेत ज्या महिलेचा चढलेला आवाज दिसला, तिची अयोग्य वर्तणूक दिसली; पण तिने असे करण्याआधी पोलीस प्रशासन आणि मोर्चाचे नेतृत्व करणारे यांनाही तिची अडचण सांगण्याचा प्रयत्न केला होता; पण त्याकडे कुणी विशेष लक्ष दिलेच नाही. तिची ही बाजू तितक्या प्रमाणात पुढे आलेलीच नाही. ज्या महिलांच्या मागण्यांसाठी पदयात्रेचे आयोजन केले होते, त्या महिलांचाच विचार अशा वेळी होणार नसेल, तर पदयात्रांचा उपयोग काय ? महिलांचा आवाज दाबण्यात येऊन पदयात्रा काढली जाते, हे कितपत योग्य ? खरेतर या महिलेची प्रतिक्रिया बोलकी होती. मुलाला आणायला आलेल्या या महिलेला पदयात्रेतील गदीर्मुळे शाळेचे वाहनच दिसत नव्हते. त्यामुळे ती कावरीबावरी झाली. एखाद्या आईसाठी ही परिस्थिती किती तणावपूर्वक असू शकते, याची कल्पना करता येईल. पोलीस, प्रशासन किंवा राजकीय पक्षातील संबंधित यांनी स्वतःला त्या महिलेच्या जागी ठेवून पहावे. मगच त्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल. यात केवळ एकाच महिलेने आवाज उठवला; परंतु अनेकांच्या मनात हा रोष असणारच आहे. केवळ कुणी व्यक्त झाले नाही इतकेच! असे असले, तरी त्या परिस्थितीत विनाकारण अडकलेल्यांचे तळतळाट मोर्चेकऱ्यांना लागले नसतील कशावरून? हे सर्व पहाता मनात प्रश्न येतो की, खरंच प्रशासन आणि राजकीय नेतृत्व यांच्यात जनतेप्रती संवेदनशीलता आहे का? मोर्चे–आंदोलने आयोजित करण्यामागे सवंग प्रसिद्धीचा विचार किती असतो आणि जनतेविषयी कळवळा किती असतो? मंत्री गिरीश महाजन म्हणाले, ''मोर्चे तर सर्वच राजकीय पक्षांचे निघतात. '' हे जरी योग्य असले, तरी मुंबईसारख्या अभूतपूर्व गर्दीच्या शहरात नागरिकांचा प्रथम विचार व्हायला हवा; पण तसे होत नाही. मुंबईत वर्षभरात अनेक मोर्चे काढले जातात किंवा आंदोलने केली जातात. यात सहस्रोंच्या संख्येने लोक उपस्थित असतात. त्यामुळे कधीही न थांबर्णाया मुंबईच्या गतीत अडथळे निर्माण होतात. हे अतिशय चुकीचे आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे आणि त्यांचे समर्थक यांनी काढलेल्या मोर्च्यांच्या वेळी तर मुंबईकरांचे प्रचंड हाल झाले होते. न्यायालयीन कामकाज विस्कळीत झाले होते. रस्त्यांवर सर्वत्र अस्वच्छता आणि गलिच्छपणा निर्माण झाला होता. अशा दुर्दशेला उत्तरदायी कोण? अशा वेळी ना मोर्चेकर्यांवर कारवाई होते, ना जनतेला न्याय मिळतो! वेठीस धरली जाते ती मात्र मुंबई! 'मुंबई आमच्या हक्काची आहे', असे प्रत्येकालाच वाटते. 'मुंबईत आलो, तरच आपल्याला काम मिळेल', 'न्याय मिळेल', 'स्वातंत्र्य मिळेल', अशी आस बाळगून प्रत्येक जण मुंबईत येतो; पण गृहित मात्र धरले जाते ते मुंबईतील नागरिकांना! अशा घटनांमुळे नागरिकांची अनेक मिनिटे वाया जात असल्याने अप्रत्यक्षरित्या राष्ट्राच्या उत्पादनक्षमतेचा वेळ वाया जातो. कोट्यवधी रुपयांची आर्थिक हानी होते, ती वेगळीच! वाहतूककोंडीमुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते. परिणामी आरोग्य बिघडते. आंदोलनांविषयी नागरिकांमध्ये नकारात्मकता निर्माण होते. त्यामुळे प्रशासन आणि सरकार यांच्यावरील विश्वास न्यून होतो. लोकशाहीचेही आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी या परिणामांचा विचार व्हावा. सामाजिक माध्यमांचा वाढता प्रभाव, तसेच राजकीय स्पर्धा यांमुळे मोर्चे किंवा आंदोलन यांना आक्रमक स्वरूप प्राप्त होते. परिणामी साहजिकच सार्वजनिक व्यवस्था कोलमडते. यासाठी काय करायला हवे? तर काटेकोर नियोजन! मोर्चांसाठी ठराविक जागा आणि मोर्चेकर्यांची संख्या निश्चित करणे, शहरातील प्रमुख मार्गांवर निर्बंध घालणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे, नागरिकांना पूर्वसूचना देणे, त्यातूनही कुणाला अडचण आल्यास तिचे त्वरित निराकरण करण्यासाठी स्वयंसेवक नेमणे आदी उपाय करायला हवेत. पोलिसांनी केवळ कायदा–सुव्यवस्था राखण्याकडे लक्ष न देता 'जनतेचे सेवक' म्हणून नागरिकांच्या समस्यांचा संवेदनशीलतेने विचार करावा. केवळ 'बघ्याची भूमिका' काय कामाची? नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास डळमळीत झाल्यामुळे त्यांना 'आपल्याला कुणीच वाली नाही', असे त्यांना वाटते. मग राग येतो. संताप अनावर होतो. रोष उफाळून येतो आणि शेवटी तो असंतोषात परिवर्तित होतो. त्यामुळे अशा घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आंदोलने आणि नागरिकांचे हक्क यांत संतुलन साधले गेले पाहिजे. आज हा आवाज एका महिलेपुरताच मर्यादित राहिला; पण उद्या परिस्थिती न पालटल्यास किंवा चिघळल्यास तो आवाज सर्वसामान्यांचा होऊन जाईल आणि ते मोर्चा किंवा आंदोलन यांपेक्षाही अतिशय महाग पडेल, हे सरकार आणि प्रशासन यांनी लक्षात ठेवावे!

# मुंबई पालिकेत सत्ता बदलल्याने काय झाले?




जसा हॅपीनेस इंडेक्स वगैरे काढला जातो, त्याचप्रमाणे जगभरातल्या प्रमुख महानगरांतल्या लोकांच्या सहनशीलतेचा अभ्यास केला, तर मुंबईतले लोक पहिल्या क्रमांकावर येतील. गेली जवळपास दोन दशके मुंबईकर फक्त आणि फक्त गैरसोयी सहन करताहेत.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सत्तेच्या काळात मुंबई महापालिकेत भ्रष्ट कारभार सुरू असल्याची टीका भाजपकडून होत होती. त्यानंतर कोविडचा काळ आला. दरम्यानच्या काळात लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांची मुदत संपली आणि महापालिकेवर प्रशासक राज आले. अशा तीन वेगवेगळ्या कालखंडांनंतर ६० हजार कोटींच्या महापालिकेवर भारतीय जनता पक्षाची सत्ता आली. महापालिका निवडणुकीत भाजपचे नेतृत्व दोन प्रमुख नेत्यांकडे होते, एक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दुसरे मुंबई भाजपचे नेते सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार. या दोघांनी निवडणुकीची व्यूहरचना आखली. ठाकरे बंधू एकत्र आले असतानाही त्यांना सत्तेत येण्यापासून रोखले. भाजपची सत्ता आणली. सत्ता आल्यानंतर आपली जबाबदारी संपली असे समजून आपापल्या मार्गाला लागले. कठिण काळात मुंबईकरांनी दिलेल्या या कौलाचा आदर राखून भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने मुंबईकरांकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे होते. दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही.

भारतीय जनता पक्ष हा निष्ठेला महत्त्व देणारा पक्ष. परंतु मूळच्या काँग्रेसच्या असलेल्या रितू तावडे यांना महापौरपद देऊन भाजपने वेगळे संकेत दिले. महापौरांसंदर्भात मत बनवण्यासाठी त्यांना प्रतीक्षा करावी लागेल. पण फर्स्ट इम्प्रेशन महत्त्वाचे असते आणि ते पाहिले तर एकूण आनंदी आनंदच दिसतो. निवड झाल्या झाल्या फुटपाथवरच्या बांगलादेशींचा विषय त्यांनी काढला. पण बांगलादेशींचा मुद्दा अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांना अडचणीत आणणारा आहे, हे त्यांना लक्षात येत नाही. भोंदू अशोक खरातला टोचून मारण्यासंदभार्तील वक्तव्य असो किंवा जैन मुनींच्या संदभार्ने केलेले वक्तव्य असो, मुंबईच्या प्रथम नागरिकाची क्षमता कोणती हे पहिल्या काही दिवसांतच कळून चुकले. टीका करणाऱ्यांना प्रत्युत्तर देताना, तुमच्या घरात आया–बहिणी नाहीत का? ही मुंबईच्या प्रथम नागरिकाची भाषा आहे, यावर विश्वास बसत नाही.

मुंबई महापालिका कायद्यानुसार आयुक्तांना जास्तीचे अधिकार आहेत, परंतु मुंबईचे महापौरपद हे मोठे प्रतिष्ठेचे पद आहे. मुंबईतल्या कोणत्याही समारंभात राज्यपाल, मुख्यमंत्र्यांच्या बरोबरीने महापौरांना मान असतो. त्यामुळे अधिकार कमी असले तरी मुंबईचा कारभार चालवण्यासाठी सक्षम महापौर दिल्याचे किमान चित्र उभे करण्याचा प्रयत्नही भाजपने केलेला नाही. म्हणजे एवढा मोठा संघर्ष करून भाजपने मुंबई महापालिकेची सत्ता हस्तगत केली. परंतु तिथे माणसे नेमताना फारशी काळजी घेतली नसल्याचे दिसून येते. प्रभाकर शिंदे यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तीकडे स्थायी समितीची सूत्रे दिली, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट. परंतु भाजपच्या नव्या व्यवस्थेने लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार यांच्यामध्ये 'प्रभावी' टोलनाका बसवला आहे. मुंबई महापालिका हे ठाकरेंचे एटीएम मशीन आहे, अशी टीका करणाऱ्या भाजपला मुंबई महापालिकेत बाहेरच्या एजंटांना किती मोकळे रान द्यायचे, हे ठरवावे लागणार आहे.

मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी अश्विनी भिडे यांना आणण्यात आले. प्रसारमाध्यमांतून त्यांचे कौतुक सोहळे सुरू झाले. महिलाराजचा गवगवा सुरू झाला. मेट्रो कारशेडसाठी मध्यरात्री वृक्षतोड करण्याशी अश्विनी भिडे यांचे नाव जोडले आहे हे विसरता येणार नाही. मुंबई मेट्रोची जबाबदारी त्यांनी उत्तमरीतीने पार पाडली, ही गोष्ट खरी. म्हणून त्या जादूची कांडी फिरवून मुंबईकरांचे जगणे सुसह्य करतील, अशी अपेक्षा बाळगून सगळी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर टाकणे अवास्तव ठरेल.

### आता मुंबईपुढची आव्हाने बघू

गेल्यावर्षी पावसाळा मे महिन्याच्या मध्यावरच सुरू झाला होता. गाळ उपसा करण्यावर त्याचा परिणाम झाला आणि मुंबईकरांना त्याचा फटका बसला. यापूर्वी नालेसफाईच्या मुद्द्यावरून भाजपने शिवसेनेवर अनेकदा आरोप केले आहेत. म्हणूनच सत्ता आल्यानंतर पहिल्या वर्षी त्यासंदर्भात अधिक काळजी घ्यायला हवी होती, ती घेतलेली दिसत नाही. यंदा कंत्राटदारांनी महापालिकेच्या अटीवर काम करणार नसल्याचे निक्षून सांगितले.

यंदा मिठी नदीतील गाळ उपसा करण्यासाठी खूप उशीर झाला. कंत्राटदार मिळत नसल्याने तसेच अन्य काही कारणांमुळे टेंडर प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली नाही. मार्चमध्ये अनेक वेळा डेडलाइन वाढवावी लागली. अखेर कंत्राटदार नियुक्त झाले आणि मार्च अखेरीस प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. गाळ काढण्यासंदभार्तील एकूण परिस्थिती पाहता पूर नियंत्रणाच्या मयार्दा उघड्या पडण्याची भीती निर्माण झाली. जसा हॅपीनेस इंडेक्स वगैरे काढला जातो, त्याचप्रमाणे जगभरातल्या प्रमुख महानगरांतल्या लोकांच्या सहनशीलतेचा अभ्यास केला, तर मुंबईतले लोक पहिल्या क्रमांकावर येतील. गेली जवळपास दोन दशके मुंबईकर फक्त आणि फक्त गैरसोयी सहन करताहेत. रस्त्यांचे खोदकाम, पुलांची पाडकामे याचा सामान्य लोकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. एकनाथ शिंदे यांच्या काळात मुंबईतले रस्त्यांचे कंत्राटदार बदलले. महामार्गाची कामे करणारे कंत्राटदार मुंबईतल्या रस्त्यांसाठी आणले. त्यांना आतल्या रस्त्यांचा अंदाजच आला नाही. त्यांनी सगळीकडे रस्ते खोदून ठेवले. शहरातील रस्त्यांच्या खालून अनेक युटिलिटी असतात. एक काम करायला गेले की दुसरी तुटते. त्यातून रोज नवे प्रश्न निर्माण होतात. वाहतूककोंडीमुळे धूर आणि रस्ते खोदल्यामुळे धूळ अशा दुहेरी प्रदूषणामुळे मुंबईकर त्रस्त झाले असून श्वसनाच्या विकारांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे.

मुंबईतल्या मराठी शाळांचा प्रश्न सातत्याने चर्चेत आहे. मराठी अभ्यास केंद्राने त्यासंदर्भात अलीकडे सातत्याने आवाज उठवला आहे. मुंबईचे मराठीपण टिकवण्यासाठीच्या बाबींचा आग्रह धरला आहे. मराठीच्या प्रश्नावर राजकारण करणाऱ्या शिवसेनेने व्यापारी फायद्यापलीकडे जाऊन असे प्रश्न हाताळले नाहीत. त्याचाच फटका शिवसेनेला बसला. भाजपची प्रतिमा मराठी विरोधी आणि हिंदी भाषिकधार्जिणा पक्ष अशी आहे. अशा परिस्थितीत मराठी शाळांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे गरजेचे आहे. बिगर मराठी माणूस हा भाजपचा मतदार असला तरी मुंबईचा कारभार मराठी माणूस केंद्रस्थानी ठेवूनच करावा लागेल.

कोविड काळात सगळीकडच्याच सार्वजनिक आरोग्य सेवेच्या मयार्दा उघड्या पडल्या. देशातील आणि आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका असा लौकिक असलेल्या मुंबईतही सार्वजनिक आरोग्य सुविधांचा बोजवारा उडाला होता. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी काही प्रयत्न केले जाणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मुंबईकरांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करता येतील. परंतु मुंबईकरांना श्वास घेता येईल, यासाठी काय केले जाणार आहे? मोकळ्या जागा, बागांचे संवर्धन करण्यासाठी भूमिका घेण्याची गरज आहे.

मुंबईची लोकसंख्या दोन कोटींच्या पुढे गेली आहे. या वाढत्या, मराठी आत्मा असलेल्या बहुभाषिक आणि आंतरराष्ट्रीय महानगराचे नियोजन करायचे तर तसे आकलन असलेले किती लोक भाजपकडे आहेत? भारतीय जनता पक्षाने आव्हानात्मक परिस्थितीत यश मिळवल्यानंतर मुंबईकरांपुढच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शहराची नस माहिती असलेल्या लोकप्रतिनिधींची एक टीम उभी करायला हवी होती. त्यातून लोकांच्या मनात एक विश्वास निर्माण झाला असता. सत्ता बदलल्याची जाणीव झाली असती. मुंबईकरांना तशी जाणीव होत नाही, हेच दुर्दैव आहे.

# भारतासमोर गझवा-ए-हिंदचे आव्हान



'गझवा–ए–हिंद' या विचारसरणीने प्रेरित होऊन त्यासाठी कार्यरत असलेल्या एका मॉड्युलचा भारतीय सुरक्षा यंत्रणांनी पदार्फाश केला. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने मुंबई, ठाणे, ओडिशा आणि बिहारमध्ये एकाच वेळी छापे टाकले. या प्रकरणात 3 राज्यांमधून 4 कट्टरपंथी तरुणांना अटक करण्यात आली आहे. मोसाईब अहमद उर्फ सोनू उर्फ कलाम (ठाणे), मोहम्मद हम्माद (मुंबई), शेख इम्रान (ओडिशा), मोहम्मद सोहेल (बिहार) अशी त्यांची नावे आहेत. या नेटवर्कमधील मुख्य आरोपी मुंबई आणि ठाण्यातील आहेत. सुरक्षा यंत्रणांनी आरोपींकडून बॉम्ब बनवण्याचे साहित्य आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. मुळात गझवा–ए–हिंद ही काय विचारसरणी आहे, याची माहिती काही अभ्यासकांना असेल, पण ती सर्वसामान्य माणसांना नसते, त्यामुळे नेमकी ही काय विचारसरणी आहे, ते जाणून घ्यायला हवी. गझवा–ए–हिंद ही एक कट्टरपंथीय विचारसरणी असून तिचा मुख्य उद्देश भारतभरात इस्लामिक शासन स्थापन करणे आणि हिंदुत्व संपवणे हा असल्याचे मानले जाते. पाकिस्तानमधील कट्टरपंथी मौलवी आणि दहशतवादी संघटनांकडून या विचारसरणीचा वापर इंटरनेट आणि सोशल मीडियाद्वारे भारतातील मुस्लीम तरुणांची माथी भडकवून त्यांना या कामासाठी सक्रिय करण्यासाठी केला जातो. गझवा–ए–हिंद या विचारसरणीचे असे हे स्वरूप आहे. अर्थात, या विचारसरणीचा काही आताच उगम झालेला नाही. भारतीय उपखंडात मुस्लिमांसाठी वेगळा देश असावा, अशी संकल्पना सुरुवातीला मुस्लीम विद्वान सय्यद अहमद खान यांनी मांडली होती.

पुढे 1947 साली महमदअली जिना आणि मुस्लीम लीगमधील त्यांच्या सहकाऱ्यांनी ती प्रत्यक्षात आणली. त्यातून भारताची फाळणी होऊन वेगळ्या पाकिस्तानची निर्मिती झाली. हिंदूबहुल भारतात अल्पसंख्याक असलेल्या मुस्लिमांची राजकीय आणि सांस्कृतिक कोंडी होईल, त्यामुळे मुस्लिमांसाठी पाकिस्तान असायला हवा, अशी त्यांची मागणी होती. 1956 च्या संविधानानुसार पाकिस्तान हे इस्लामिक प्रजासत्ताक झाले. इस्लाम हा देशाचा अधिकृत धर्म आहे. पण भारतात अशी परिस्थिती नव्हती, भारतीय राज्यघटना ही सर्वधर्मसमभाव मानणारी अशीच निर्माण करण्यात आली. त्यामुळे इथे कायद्यासमोर सर्व धर्म सारखेच आहेत. मुसलमानांसाठी पाकिस्तान बनल्यानंतर अखंड भारतातील सगळे मुसलमान पाकिस्तानात जातील, आणि पकिस्तानातील सगळे हिंदू भारतात येतील, असा अंदाज होता. पण तसे झाले नाही. अनेक मुस्लिमांनी भारतातच राहणे पसंत केले. पण पाकिस्तान हे कायदेशीरदृष्ट्या मुस्लीम राष्ट्र घोषित करण्यात आल्यानंतर इतर धर्मियांना म्हणजेच हिंदू, शीख, ख्रिश्चन, बौद्ध यांना इथे काही स्थान राहिले नाही. त्यांना तिथे राहणे अवघड होऊन बसले. त्यामुळे अनेकांनी जीव गमावला किंवा भारतात निघून आले. त्यामुळे आता पाकिस्तानात मुस्लिमेतरांची संख्या फारच कमी आहे. दुसऱ्या बाजूला फाळणीनंतर मागे भारतात राहिलेल्या मुस्लिमांची संख्या वाढून आता ती पाकिस्तानातील मुस्लिमांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त झालेली आहे. त्याला त्यांच्या धमार्तील तत्वानुसार कुटुंबनियोजनावर असलेली बंदी आणि आधुनिक शिक्षणाचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत.

सय्यद अहमद खान यांनी ज्या वेगळ्या मुस्लीम राष्ट्राचा वैचारिक पाया घातला होता, त्यांची अंमलबजावणी महमद अली जिना यांनी 1947साली केली. त्यांनी वेगळ्या पाकिस्तानची निर्मिती केली. त्यानंतर स्वतंत्र देश झालेल्या पाकिस्तानने आपल्या देशवासीयांच्या विकासावर लक्ष केंद्रित करायला हवे होते. पण तसे न करता ते भारताविरोधात लढतच राहिले. जेव्हा त्यांना कळाले की, आपण थेट लढू शकत नाही, तेव्हा त्यांनी भारताविरोधात छुप्या युद्धाचा अवलंब केला. त्यासाठी प्रामुख्याने जम्मू–काश्मीरमध्ये दहशतवाद सुरू केला, त्या भागात मोठ्या संख्येने मुस्लीम लोक राहत असल्यामुळे धार्मिक आधारावर त्यांनी त्यांना भडकवले. तिथल्या हिंदू लोकांच्या हत्या घडवून त्यांना घरदार सोडून पळून जायला भाग पाडले. भारताच्या इतर भागातही घातपाताच्या कारवाया करण्यात येऊ लागल्या. त्यासाठी मुंबई शहर हे त्यांचे प्रमुख लक्ष्य राहिले. कारण मुंबई भारताचे आर्थिक राजधानीचे केंद्र आहे. भारताची राजधानी दिल्लीतही घातपाती कारवाया करण्यात आल्या. संसद भवनावरील हल्ल्यामागील सूत्रधार अफजल गुरू होता. तो भारतीय नागरिक असला तरी त्याचे आका पाकिस्तानी होते. गझवा–ए–हिंद ही विचारसरणी पाकिस्तानच्या निर्मितीनंतर उदयाला आली. कारण भारतापासून वेगळा पाकिस्तान तर मिळवलेलाच आहे, पण आता जो बाकी भारत आहे, त्याचेही आपल्याला इस्लामीकरण करायचे आहे, हा या विचारसरणीचा हेतू आहे.

पाकिस्तानचा त्यासाठी बालेकिल्ला म्हणून वापर करण्यात येतो. भारतात घडवायच्या घातीपाती किंवा धर्मांतराच्या कारवायांना तिथून चालना देण्यात येते, त्याचे सूत्रधार पाकिस्तानात बसलेले असतात. तिकडे बसलेले सूत्रधार धर्माच्या आधारावर भारतातील मुस्लिमांना भारताचे इस्लामीकरण करण्यासाठी प्रोत्साहित करतात. आता सोशल मीडियाचा काळ आहे, त्यामुळे गझवा–ए–हिंदचा प्रसार अधिक वेगाने करणे शक्य झालेले आहे. ३ राज्यांमधून चार मुस्लीम तरुणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या संपर्कात अधिक तरुण असू शकतात. महाराष्ट्रात नाशिकमध्ये टीसीएस कंपनीत हिंदू तरुणींचे जबरदस्तीने धर्मांतरण होत असल्याचे उघड झाले आहे, इतकेच नव्हे तर परतवाडा, नागपूर इथून असे धर्मांतराचे प्रकार उघड होत आहेत. वेगळा पाकिस्तान मिळविल्यानंतर आता भारताचे इस्लामीकरण करण्याचे काम त्या बालेकिल्ल्यातून सुरू आहे, भारतीय समाज आणि सरकार यांच्यासमोर हे एक मोठे आव्हान आहे. कारण धर्मवेडासमोर थोडे संख्याबळही पुरेसे पडते. जेव्हा वेगळ्या पाकिस्तानची हिंसक पद्धतीने निर्मिती करण्यात आली, तेव्हा त्याची मागणी करणायांची संख्या भारताच्या सगळ्या लोकसंख्येच्या तुलनेत कमी होती.

# तर्क कठीण, अंदाज अवघड



**आक्रमक पवित्रा, युद्धाच्या धमक्या आणि आर्थिक नाकेबंदी करूनही इराणला नमवण्यात आलेले अपयश, हे सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी सर्वात मोठे राजकीय संकट बनले आहे. इराणने अमेरिकेवर अविश्वासाचा शिक्का मारत वाटाघाटी नाकारल्याने ट्रम्प स्वतःच विणलेल्या चक्रव्युहात अडकले आहेत.'**

अमेरिकेने जाहीर केलेल्या संघर्ष विरामाची मुदत काल पहाटे संपली, तरी संध्याकाळपर्यंत अमेरिका किंवा इराणने परस्परांवर कोणताही नवा हल्ला केला नव्हता. अमेरिका आणि इराणमध्ये सुरू झालेल्या चचेर्ची पहिली फेरी निष्फळ ठरली. त्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानला पुन्हा पुढे करून चर्चेच्या दुसऱ्या फेरीची घोषणा केली. पाकिस्तानने इराणची समजूत काढण्याचे प्रयत्न केले. चचेर्साठी कडेकोट बंदोबस्त केला. अमेरिकेचे शिष्टमंडळ इस्लामाबादला पोहोचलं. पण, इराणने या सगळ्याला प्रतिसादच दिला नाही. शिष्टमंडळ पाठवणं दूरच; उलट अमेरिकेवर अविश्वासाचा आरोप केला. अमेरिकेने स्वतःहून दोन आठवडे युद्धबंदी करून बोलण्यांच्या दुसऱ्या फेरीसाठी भरपूर दबाव टाकूनही इराण अजिबात बधला नाही. उलट, पूर्वीच्या अटी – शर्तींमध्ये वाढ करून त्याची पूर्तता झाली, तरच बोलण्यासाठी बसू, असा पवित्र घेतला. इराणच्या या भूमिकेमागे चीन आणि रशिया या दोन महासत्तांची फूस आहे, असं जागतिक पातळीवर मानलं जातं आहे. असेलही. त्यांची पडद्याआडून मदत असेल, नैतिक आधार असेल; पण युद्धातले वार झेलावे लागताहेत ते एराणलाच ना? सर्वोच्च राष्ट्रप्रमुखासह अनेक वरिष्ठ सैन्याधिकारी गमावून, स्थावर मालमत्तेचं बरंच नुकसान सोसूनही इराण अमेरिकेसमोर मान तुकवायला तयार नाही, ही बाब जगात सर्वसामान्यांच्या दृष्टीने कौतुकाची ठरते आहे. आक्रमक डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेत्यानाहू या दोघांच्याही विरोधात त्यांच्या त्यांच्या देशात रोज निदर्शनं सुरू झाली आहेत. जनक्षोभ वाढतो आहे. तशी परिस्थिती इराणमध्ये नाही. उलट, ट्रम्प ज्या सत्तापालटाचं श्रेय घेत आहेत, त्या सत्तापालटातून तिथे आलेलं 'इस्लामिक रिवोल्युशनरी गार्ड' आधीच्या सत्ताधीशांपेक्षा अमेरिकेविरोधात अधिक कडवं आहे! युद्धविरामाची मुदत संपताच आम्ही इराणवर प्रचंड मोठा हल्ला करू, सगळं बेचिराख करून टाकू वगैरे धमक्या देणाऱ्या ट्रम्प यांनी प्रत्यक्षात मुदत संपल्यानंतर बारा तास उलटूनही काहीही केलं नाही. हा संयम त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नाही. हा नाईलाज आहे. इराणसह संपूर्ण वैश्विक राजनैतिक वर्तुळ हे जाणून आहे. म्हणून ते आता ट्रम्प यांच्यासमोर अटीवर अटी ठेवू लागले आहेत.त्यांच्या धमक्यांकडे सहज दुर्लक्ष करू लागले आहेत. या युद्धाचा शक्य तितक्या लवकर शेवट ही आता ट्रम्प यांची गरज आहे. इराणची नाही. मोठ्या सिंहगर्जना करून ट्रम्प यांनी ज्या चढाया केल्या, त्या सगळ्या फुकाच्या ठरण्याच्या भीतीने ट्रम्प यांना ग्रासलं आहे. ते स्वतःहूनच या सापळ्यात शिरले आहेत. त्यातून सुटण्यासाठी त्यांना सध्यातरी पाकिस्तानशिवाय दुसरा कुठला आधार दिसत नाही. ट्रम्प यांच्यावर किती नामुष्की ओढवली आहे, याची कल्पना यावरून यावी. काँग्रेसच्या, म्हणजे अमेरिकेच्या संसदेच्या रितसर पूर्वपरवानगीविना राष्ट्रपतींनी परस्पर किती दिवस युद्ध करावं, त्यासाठी किती काळ सैन्य वापरावं, याला कायदेशीर मयार्दा आहेत. अमेरिकेचा कोणताही राष्ट्रपती युद्धारंभापासून ६० दिवसांपेक्षा अधिक काळ संसदेच्या रीतसर पूर्वपरवानगीविना युद्ध सुरू ठेवू शकत नाही. या ६० दिवसांना आणखी ३० दिवसांची मुदतवाढ आहे. पण, ती आपल्याच सैन्याला माघारी आणण्यासाठी. अमेरिकेने इराणवर क्षेपणास्त्राचा पहिला थेट हल्ला २८ मार्चला केला असला, तरी सैन्याची जमवाजमव आणि हलवाहलव त्यापूर्वीच सुरू केली होती. सैन्याच्या या हालचालीसाठी त्यांना २ मार्चला अधिकृत लेखी कल्पना द्यावी लागली होती. म्हणजे, २ मार्चपासून ६० दिवस मोजले, तर ही मुदत १ मे रोजी संपते. १ मेपर्यंत युद्ध कायमचं थांबलं नाही, तर ट्रम्प यांना सैन्याचा बेकायदा वापर करावा लागेल. या कायदेभंगासाठी अमेरिकेत ज्या तरतुदी असतील, त्याला त्यांना सामोरं जावं लागेल. हे टाळण्यासाठी ट्रम्प इराण विरुद्ध केलेल्या कारवाईला 'युद्ध' म्हणत नाहीत. 'सैनिकी मोहीम' म्हणताहेत. ही शाब्दिक पळवाट कितपत कामी येईल, याविषयी त्यांना स्वतःलाच शंका आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सन्मान्य तोडगा काढून १ मेपूर्वी हा संघर्ष संपवण्याचा, संपूर्ण अमेरिकी सैन्य परत मायदेशी बोलावण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या या प्रयत्नाला कोणाचीच साथ नाही. उलट, ट्रम्प या सापळ्यात अडकावे, अशीच बहुतेकांची इच्छा आहे. ट्रम्प यांच्या मनमानी विक्षिप्तपणाचा, अशिष्टपणाचा प्रसाद सगळ्यांनाच मिळाला आहे. पाहुण्याच्या काठीने साप मारला जात असेल, तर कोण कशाला मधे पडेल? सगळे परिणामाची वाट पाहत आहेत. मार्च अखेरीला सुरू झालेल्या या युद्धात आतापर्यंत ५ हजारांहून अधिक बळी गेले आहेत. सैनिकांबरोबरच सामान्य नागरिकांचाही त्यात समावेश आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून जगाला वेठीला धरण्याचं सामर्थ्य या संघर्षात काहीही कारण नसताना इराणला प्राप्त झालं आहे. तेलाच्या किमती बॅरलला ११० अमेरिकेत डॉलरवर पोहोचल्या होत्या. ५० अब्ज अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक नुकसान या संघषार्ने केलं आहे. हे सगळं करून अमेरिकेने मिळवलं काय? जी सामुद्रधुनी याआधी खुली होती, तीच खुली करण्यासाठी वाटाघाटी? काही कोटी डॉलर खर्चूनही अमेरिकेच्या हिताचं आतापर्यंत तरी काहीच झालेलं नाही. उलट, अनेक बाबतीत अमेरिकी सामर्थ्याची जी झाकली मुठ होती, ती उघडी पडली. त्याने अमेरिकेची प्रतिष्ठा, दबदबा, धाक धुळीला मिळाला. त्यामुळे, ट्रम्प आता काय करतील? होर्मुझवरचा थोडासा ताबा दाखवून, इराणमधील सत्तापालटाचं श्रेय घेऊन 'मोहीम फत्ते झाल्या'चं जाहीर करून आपलं सैन्य माघारी बोलावतील, की ९/११ नंतर अनिश्चित काळासाठी सैनिकी कारवाई करायला '२०११ एयुएमएफ'द्वारे मिळालेल्या अधिकारांचा उपयोग इथे करून युद्ध लांबवतील? ट्रम्प असल्याने तर्क लढवणं अवघड आणि अंदाज बांधणंही कठीण!

# चंदनाचे 'हे' फायदे

भारतीय संस्कृतीमध्ये चंदनाचे झाड हे पवित्र मानले जाते. धार्मिक विधी अथवा देवपूजेसाठी चंदन वापरण्यात येते. चंदनाच्या खोड आणि पावडरला आयुर्वेदिक शास्त्रातदेखील महत्त्वाचे स्थान आहे.शिवाय चंदनामध्ये अनेक आरोग्यदायी गुणधर्म असतात ज्यामुळे चंदन अनेक आरोग्य समस्यांवर उपयुक्त आहे. चंदनाचे झाड कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येते. मात्र चंदनाचे झाड दुर्मिळ असल्यामुळे या झाडाची मोठा प्रमाणावर तस्करी करण्यात येते. चंदन थंड गुणधमार्चे असल्यामुळे शरीरातील दाह चंदनाच्या लेपामुळे कमी होतो. शिवाय चंदनाला एक सुंदर सुंगध असतो. ज्यामुळे चंदनाचा वापर अत्तर, अगरबत्ती, परफ्युम, साबण तयार करण्यासाठी केला जातो. चंदन अगदी प्राचीन काळापासून सौंदर्य खुलविण्यासाठीदेखील वापरण्यात येते. पूर्वीच्या काळी महाराजे आणि महाराण्यांना चंदनाचा लेप लावून शाहीस्नान घालण्यात येत असे. चंदनाच्या लेपामुळे त्वचा मऊ आणि चमकदार होते. शिवाय चंदनाचा लेप लावल्यामुळे अनेक त्वचा समस्यादेखील हळूहळू कमी होतात. उन्हाळा सुरू झाला की त्वचेवर पुरळ, घामोळे, इनफेक्शन अशा अनेक समस्या निर्माण होतात. यासाठी उन्हाळ्यात होणाऱ्या या त्वचा समस्या आणि त्वचेचा दाह कमी करण्यासाठी तुम्ही चंदनाचा लेप अथवा फेसपॅक जरूर लावू शकता. चंदनाचे खोड दगडावर अथवा सहानेवर उगाळून त्याचा लेप काढा अथवा एक चमचा चंदन पावडर घ्या. चंदन पावडरमध्ये एक चिमुट हळद मिसळा आणि दूध अथवा गुलाबपाण्याने त्याची एक पेस्ट तयार करा. जर तुमची त्वचा तेलकट असेल तर गुलाबपाणी वापरा आणि जर तुमची त्वचा कोरडी असेल तर दूध वापरा. चेहऱ्यावर हा फेसपॅक ब्रश अथवा हाताच्या मदतीने एकसमान लावा. वीस मिनीटांनी फेसपॅक सुकल्यावर चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ करा. चेहरा सुती कापडाने स्वच्छ करा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावर एक नैसर्गिक चमक येईल. आठवड्यातून एकदा हा फेसपॅक चेहऱ्यावर लावल्यास त्वचेवरील काळे डाग, पुरळ, पिंपल्स कमी होतात.



# काळ्याभोर दाट केसांसाठी वरदान 'आवळा'

केसांचं आयुवेर्दात आवळ्याला ईश्वरीय देणगी म्हंटल आहे. याच कारण म्हणजे आवळा हे एकमेव फळ आहे, जे वात, पित्त आणि कफ या तिन्ही रोगांचं निवारण करतं. अगदी शास्त्रज्ञांनीसुध्दा आवळ्यामध्ये अंड्यापेक्षा जास्त बळ देण्याची क्षमता आहे, हे मान्य केलंय. मांसाहारी लोकांना त्यांच्या वेगवेगळ्या आहारातून अनेक प्रकारचं पोषण मिळतं. मात्र शाकाहारी लोकांना फक्त आवळा खाऊनसुध्दा हे पोषण मिळू शकतं. त्याचमुळे आवळ्याला आधुनिक युगात 'सुपरफ्रूट' तर आयुवेर्दात 'अमृत फळ' असे म्हणतात.

## सुंदर आणि लांब केसांसाठी आवळ्याचे घरगुती उपाय

तसं पहायला गेलं तर आवळ्याचे गुणधर्म विविध रोगांवर गुणकारी आहेत. पण आज आपण केसांसाठी आवळा कसा उपयुक्त ठरतो, ते पाहू. तुम्हाला माहित्येय का, आवळा वापरल्याने तुमचे केस रेशमासारखे मऊ आणि सुंदर होऊ शकतात. पांढरे केस काळे होऊ शकतात, टक्कल जाऊ शकतं, एवढचं नाही तर नव्याने केसही येऊ शकतात. केसांच्या विविध समस्यांवर आवळ्याचा उपयोग कसा करायचा, हे आम्ही तुम्हाला सांगण तुम्ही लहानपणापासून आवळा खात असाल, वापरत असाल तर अगदी म्हातारपणापर्यंत तुमचे केस काळेभोर राहतील. पण जर असं नसेल तर केस पांढरे होतील. त्यावर उपाय म्हणून बाजारातील केमिकलयुक्त डाय वापरण्याऐवजी आवळ्याचा वापर करा. त्यासाठी एक लिटर आवळ्याच्या रसात एक लिटर साजूक तूप किंवा तेल घाला. या मिश्रणात २५० ग्रॅम मुलदी मिक्स करुन हे मिश्रण कमी आचेवर उकळा. जेव्हा तेलामधून पाणी उडून जाईल, तेव्हा तेल गाळून बाटलीत भरुन ठेवा. डायपेक्षा हे तेल लावा. काही दिवसांतच तुमचे बहुतेक केस काळे होतील. त्याचबरोबर लिंबाचा रस आणि आवळा पावडर लावून केस धुवा. असं केल्याने केस मऊसूत तर होतीलच शिवाय काळेही होतील.

## केस गळतीवर घरगुती उपाय

धावपळीच्या युगात केस गळतीची समस्या कोणाला जाणवत नाही? ही गळती थांबण्यासाठी रात्रभर पाण्यात आवळे भिजत घाला. सकाळी त्या पाण्यात लिंबाचा रस मिसळा. आता हे पाणी हळूवारपणे केसांना चोळत केस धुवा. त्यामुळे केसांचं गळणं कमी होईल. महिनाभर हा उपाय केलात तर तुमचे केस दाटही दिसू लागतील.

जसं एका दिवसात टक्कल पडत नाही तसंच त्यावर एका दिवसात केसही येत नाहीत. म्हणूनच त्यावर आवळ्याचा वापर वेगवेगळ्या पध्दतीने करणं गरजेचं आहे. आठवड्यातून किमान तीनदा तरी आवळ्याच्या रसाने डोक्याला मालिश करायला हवी. डोकं धुतानाही पाण्यात आवळ्याचा रस टाका. त्याचसोबत जेव्हा आणि जितका शक्य होईल तितका आवळा दातांनी चावून खा. लवकरच तुम्हाला त्याचा फायदा जाणवू लागेल.

## डोक्यात उवा झाल्यात... आवळा आहे ना...

लहान मुलांच्या डोक्यात उवा झाल्या तर आवळ्याचं बी बारीक दळून घ्या आणि त्यात लिंबू पिळून मिक्स करा. केसांमध्ये भांग पाडून हे मिश्रण लावा. २ तासांनी केस धुवा. उवांचा त्रास कमी होईल.

## केसांच्या समस्यांपासून मुक्तीसाठी तुमच्या रुटीनमध्ये सामील करा 'आवळा'

तुम्हाला जर तुमचे केस कायम लांबसडक, सुंदर, चमकदार, दाट, मऊसूत आणि काळेभोर असावेत असं वाटत असेल तर मग सोप्पं आहे. रोजच्या दैनंदिन जीवनात आवळ्याचा समावेश करा. अगदी सकाळच्या नाश्त्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत तुम्ही आवळ्याला डाएटमध्ये सामील करु शकता आणि नेहमीच आवळ्याचं तेलही केसांना लावू शकता. तुम्हाला प्रश्न पडला असेल की, आवळ्याला डाएटमध्ये कसं सामिल करायचं? खूप पर्याय आहेत आणि आजकाल बाजारात खाऱ्या किंवा गोड चवीची आवळा कॅंडीसुध्दा मिळू लागली आहे. ही कॅंडी तुम्ही सकाळी नाश्ता करताना किंवा संध्याकाळी केव्हाही खाऊ शकता.






आपल्या देशामध्ये वेगवेगळ्या पाककृतींमध्ये गरम मसल्यांचा समावेश केला जातो. यामुळे स्वयंपाकाची चव वाढण्यास मदत मिळते. सोबतच याद्वारे आपल्याला आरोग्यदायी फायदे देखील मिळतात. औषधी गुणधर्मामुळे काही मसाल्यांना आयुर्वेदामध्येही विशेष स्थान देण्यात आले आहे. यापैकीच एक म्हणजे हळद. हळद ही एक अशी औषधी वनस्पती आहे, ज्यामुळे आपल्याला आरोग्यवर्धक तसंच सौंदर्यवर्धक देखील लाभ मिळतात. हळदीमध्ये कित्येक प्रकारच्या अँटी ऑक्सिडेंटचा समावेश आहे. यातील पोषण तत्त्वांमुळे शरीराला आलेली सूज किंवा एखादी दुखापत ठीक होण्यास मदत मिळते. जर तुम्ही न चुकता गरम पाण्यातून हळदीचे सेवन केले तर तुम्हाला दुप्पट लाभ मिळण्याची शक्यता आहे. हळदीचे पाणी कसे तयार करायचे आणि किती प्रमाणात प्यायचे? याची सविस्तर माहिती जाणून घेऊया.

## गरम पाणी आणि हळदीचे फायदे

- हळदीमध्ये लिपोपोलीसॅचिरिड चे घटक आहेत. ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत मिळते. यामुळे ताप, सर्दी आणि खोकल्याचा त्रास कमी होतो.
- हळदीमुळे एखादी जखम देखील लवकर भरते.
- हळदीचे पाणी प्यायल्यास स्नायूंना मजबुती मिळते. ज्यामुळे सांधेदुखी आणि आर्थरायटिस यासारख्या आजारांचा धोका कमी होतो.
- कॅन्सर सारख्या गंभीर आजारापासून देखील आपलं संरक्षण होण्यास मदत मिळते.
- हळदीतील पोषण तत्त्वांमुळे खराब कोलेस्ट्रॉल देखील कमी होते.
- हळदीमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी, अँटी ऑक्सिडेंट, अँटी- ट्यूमर, अँटी सेप्टिक, अँटी वायरल, कार्डियो प्रोटेक्टिव आणि किडनीसाठी पोषक असणारे औषधी गुणधर्म आहेत.
- तुम्ही वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करत असाल तर हळदीचे पाणी प्या. वजन घटण्यास नक्कीच मदत होईल.
- वजन वाढीमुळे हृदय रोग, स्ट्रोक आणि मधुमेह यासारख्या आजारांचा धोका वाढत राहतो.
- पण योग्य प्रमाणात हळदीचे पाणी प्यायल्यास पोट आणि ओटी पोटावरील चरबी कमी होईल.
- यामध्ये असणाऱ्या कर्क्युमिन घटकामुळे अतिरिक्त चरबी कमी होते.

**चिंता आणि तणावाचा त्रास होतो कमी -** चिंता, ताणतणावाची समस्या कमी करण्यासाठी हळदीचे सेवन करणं हा रामबाण उपाय आहे. हळदीमध्ये अँटी एंग्झायटी चे गुण आहेत. ज्यामुळे शारीरिक तसंच मानसिक ताणतणाव कमी होण्यास मदत मिळते. तसंच यातील अँटी- ऑक्सिडेंट चे गुणधर्म नैराश्य कमी करण्यास मदत करतात.

**मासिक पाळी -** काही महिलांना मासिक पाळीमध्ये प्रचंड त्रास होतो. मासिक पाळीत ओटी पोट, पाठ आणि पोटदुखीचा त्रास होतो. हा त्रास कमी करण्यासाठी तुम्ही हळदीचे पाणी किंवा हळदीचे दूध पिऊ शकता.

## कधी प्यायचे हळदीचे पाणी?

- जर तुम्हाला भरपूर प्रमाणात आरोग्यदायी लाभ हवे असतील तर रोज सकाळी रिकाम्या पोटी हळदीच्या पाण्याचे सेवन करा. सकाळच्या सुमारास या पाण्याचे सेवन करणं लाभदायक ठरते.

## कसे तयार करायचे हळदीचे पाणी?

- एक ग्लास गरम पाणी घ्या आणि एका पॅनमध्ये ते उकळत ठेवा.
- या पाण्यामध्ये आता एक छोटा चमचा हळद पावडर टाका आणि चांगल्या प्रकारे पाणी ढवळत राहा.
- तुम्हाला हवे असल्यास यामध्ये मधाचा समावेश करू शकता.
- नियमित सकाळी हे पाणी तुम्ही पिऊ शकता.

# चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो हवा असेल तर त्वचेवर लावा 'दुधाची साय'

दुधावरची मऊ आणि पांढरीशुभ्र साय खाण्यात एक वेगळीच मजा येते. या सायीला आपण मलई असंही म्हणतो. मात्र काहीजण फिटनेस अथवा वजन नियंत्रित राखण्यासाठी ही मलई खाणं पसंत करत नाहीत. तुम्हालादेखील साय अथवा मलई खाणं नको असेल तर तिचा वापर तुम्ही तुमचं सौंदर्य वाढविण्यासाठी करू शकता. दुधाची साय अथवा मलईमुळे तुमच्या त्वचेवर नक्कीच चांगले परिणाम होऊ शकतात. सायीमध्ये असलेले पोषकतत्त्व तुमच्या त्वचेला मऊ आणि चमकदार करतात. शिवाय यासाठी फार खर्च मुळीच करावा लागणार नाही. घरात असलेल्या दुधावर येणारी साय वापरून तुम्ही तुमचे सौंदर्य खुलवू शकता. सायीमध्ये असं काय असतं ज्यामुळे तुमच्या त्वचेवर एवढा चांगला परिणाम होतो हे जाणून घेण्यासाठी दुधाच्या सायीचे हे फायदे जरूर वाचा.

**१.उत्तम मॉश्चराईझर :** दुधावर जमा होणारी साय म्हणजेच मलई तुमच्या त्वचेचं चांगलं पोषक करते. म्हणूनच तुम्ही साय एक नैसर्गिक मॉश्चराईझर म्हणून वापरू शकता. यासाठी एका वाटीत ताजी साय घ्या आणि चमचा अथवा बीटरने बीट करून तिची एक मऊसुत पेस्ट तयार करा. त्वचेवर काही मिनीटे या पेस्टने मसाज करा. ही पेस्ट तुमच्या त्वचेत मुरू द्या. थोड्यावेळाने चेहरा स्वच्छ धुवून टाका. यामुळे तुमच्या त्वचेतील कोरडेपणा कमी झालेला आणि त्वचा फ्रेश झालेली तुम्हाला जाणवेल.

**२.अँटि एजिंग क्रीम :** वाढते प्रदूषण आणि धकाधकीचे जीवन यामुळे वयाच्या आधीच म्हातारपणाची लक्षणे चेहऱ्यावर दिसू लागतात. जर तुम्हाला चिरतरूण दिसायचं असेल तर चेहऱ्यावर नियमित दुधाची साय जरूर लावा. दुधातील प्रोटिन्स आणि इतर पोषक घटकांमुळे तुमच्या चेहऱ्यावरील एजिंगच्या खुणा कमी होऊ लागतील. सुरकुत्या कमी करण्यासाठी हा एक बेस्ट उपाय ठरेल.

**३. काळे डाग कमी करण्यासाठी उपयोगी :** ज्यांच्या चेहऱ्यावर काळे डाग आणि चट्टे आहेत. त्यांना दुधाची साय नक्कीच फायदेशीर आहे. कारण डाग आणि काळ्या चट्टांमुळे तुमचे सौंदर्य डागाळले जाते. जर तुम्ही नियमित चेहऱ्यावर दुधाची साय लावली तर चेहऱ्यावरील हे डाग कमी होण्यास मदत होऊ शकते. डाग कमी करण्यासाठी दुधाची साय आणि एक ते दोन थेंब लिबांचा रस टाकून एक पेस्ट तयार करा आणि ती चेहऱ्यावर लावा.

**४. त्वचेवर नैसर्गिक चमक येते :** जर तुमची त्वचा धुळ आणि प्रदूषणामुळे निस्तेज झाली असेल तर दुधाची साय तुमच्यासाठी वरदानच ठरेल. कारण दुधातील पोषक घटक या सायीमध्ये एकत्र झालेले असतात. ज्यामुळे त्वचेला नैसर्गिक चमक प्राप्त होते. यासाठी दुधाच्या सायीमध्ये काही थेंब मध टाका आणि त्याची पेस्ट चेहऱ्यावर लावा. आठवड्यातून कमीत कमी दोन ते तीन वेळा हा प्रयोग केल्यास तुमच्या त्वचेवर एक नैसर्गिक ग्लो येऊ लागेल.

**५. टॅनिंग कमी होतं.** बाहेर फिरताना सुर्यप्रकाशामुळे त्वचा बऱ्याचदा टॅन होते. हे सनटॅन काढण्यासाठी तुम्ही मलईचा वापर करू शकता. कारण त्यामुळे तुमच्या त्वचेला एक प्रकारचा उजळपणा मिळू शकतो. त्वचेला क्लिंझिंग, मॉश्चराईझिंग आणि टोनिंगची गरज असते. सायीमध्ये लॅक्टिक ॲसिड योग्य प्रमाणात असतं. ज्यामुळे तुमच्या चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि तुम्ही नेहमीपेक्षा अधिक सुंदर दिसू लागता.



# ५ दिवसात तुमच्याही पापण्या होतील लांब, करा हे उपाय

**पापण्यांना काही लावण्याआधी -** अनेकांच्या पापण्या लांब जन्मतःच लांब आणि जाड असतात. तर काहींना अगदी नावाला पापण्या असतात. पण पापण्या म्हणजे केसच आहेत. त्या तुम्हाला अगदी कधीही वाढवता येऊ शकतात. आता पापण्यांची ही वाढ प्रत्येकांच्या केसांच्या वाढीवर अवलंबून आहे. काहींच्या पापण्या अगदी ३ ते ४ दिवसातही वाढतात.तर काहींच्या पापण्या वाढायला आठवडाही लागू शकतो. त्यामुळे ही वाढ प्रत्येकावर अवलंबून आहे. पण हे उपाय नक्कीच कामी येतील यात काही शंका नाही.



**ऑलिव्ह ऑईल -** पापण्यांच्या वाढीवर ऑलिव्ह ऑईल अगदी बेस्ट आहे. रात्री झोपताना तुम्हाला कॉटन बड्सचे टोक या तेलात बुडवायचे आहे. डोळा अलगद हाताने वर करुन तुम्हाला आतल्या बाजूने ऑलिव्ह ऑईल लावायचे आहे. डोळ्यांच्या खाली आणि वर तुम्हाला दोन्ही बाजूने हे तेल लावायचे आहे.

ऑलिव्ह ऑईल लावायला जड असते. त्यामुळे ते अगदी थोडेच लावा. सकाळी उठल्यानंतर तुम्हाला तुमचे डोळे जड वाटतील. त्यामुळे सकाळी उठल्या उठल्या तुम्ही मेकअप क्लिनझरने तुम्ही तुमचे डोळे स्वच्छ करुन घ्या.

**नारळाचे तेल -** नारळाचे तेल केसांवरील उत्तम उपाय आहे. प्रत्येकाच्या घरात ते सहज उपलब्ध असते. जर तुम्हाला तेलाचा त्रास होत नसेल तर तुम्ही नारळाचे तेल कोमट करुन तुमच्या डोळ्याभोवती फिरवून मसाज करा.जर तुमचा चेहरा तेलकट प्रकारातील असेल तर मात्र तुम्ही कापसाने किंवा बड्सने तुमच्या पापण्यांना खोबरेल तेल लावा. ऑलिव्ह ऑईलच्या तुलनेत हे तेल पातळ असते.त्यामुळे हे काढताना त्रास होत नाही. तुमच्याकडे घरी काढलेलं नारळाचं तेल असेल तर फारच उत्तम

**बेबी ऑईल -** जर तुम्हाला वरील कोणतेही तेल वापरायचे नसेल तर तुम्ही बेबी ऑईलचा पर्यायदेखील निवडू शकता. बेबी ऑईल लावायला फारच सोपे असते. तुम्हाला रात्रीच बेबी ऑईल तुमच्या पापण्यांना लावायचा आहे. या तेलाचे कोणतेही दुष्परिणाम नाही. उलट त्यामुळे तुमच्या चेहऱ्याला आवश्यक असलेले व्हिटॅमिन मिळते. त्यामुळे तुम्ही हे लावल्यास काहीच हरकत नाही.

**व्हिटॅमिन ए ऑईल -** व्हिटॅमिन ए ऑईलचे टॅबलेट बाजारात मिळतात. हे तेलही केसांसाठी फार चांगले असते. त्यामुळे तुम्ही याचा वापर देखील करु शकता. रात्री झोपताना तुम्ही तुमच्या पापण्यांना हे तेल लावा. त्यामुळे तुमच्या पापण्या वाढतील.

**कापसाचा बोळा -** जर तुम्हाला तेल लावायचे नसेल तर तुमच्यासाठी अगदी सोपा पर्याय म्हणजे कापसाचा बोळा. अगदी फावल्या वेळात तुम्हाला तुमच्या पापण्यांवरुन कापसाचा बोळा किंवा इअर बड्स विरुद्ध दिशेला फिरवायचे आहे. कापसाच्या बोळ्यामुळे तुमच्या पापण्यांना एक वेगळा आकार येतो. त्या पापण्या मोठ्या दिसू लागतात.

# ५ उपाय जे केल्यास रोबोटसारखं काम करूनही थकणारच नाही

- **१५ मिनिटांचं मेडिटेशन करा -** ध्यानधारणा अर्थात मेडिटेशन हा आराम करण्याचा एक अद्भुत मार्ग आहे. केवळ १५ मिनिटे ध्यानधारणा केल्याने शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. जे सुस्ती आणि थकवा दूर करण्यास मदत करते.
- **रोज एक्सरसाईज करा -** जे लोक दररोज व्यायाम करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा कमी थकवा जाणवतो. दररोज 30 मिनिटे व्यायाम केल्याने रक्तप्रवाह अर्थात ब्लड फ्लो, एंडोर्फिन आणि एकूणच फिटनेसमध्ये वाढ होऊ शकते.
- **सुर्यप्रकाशाचा आनंद घ्या -** सूर्यप्रकाशाच्या पुरेशा संपकार्तून व्हिटॅमिन डी मिळते. हे जीवनसत्व सेरोटोनिन तयार करण्यास मदत करते. जे मूड आणि रिलॅक्सेशन नियंत्रित करणारे न्यूरोट्रांसमीटर आहे.
- **रिलॅक्सिंग म्युजिक ऐका -** जर तुम्ही दिवसभर थकला असाल तर झोपण्यापूर्वी आरामदायी किंवा रिलॅक्स करणारे एखादे संगीत ऐकणे फायदेशीर ठरू शकते. यामुळे मूड रिलॅक्स होऊन डोके शांत होते. ज्यामुळे चांगली झोप येते आणि दुसऱ्या दिवशी तुम्हाला दिवसभर उत्साही वाटते.
- **मित्रमैत्रीणींना भेटा -** तणाव दूर करण्यासाठी सोशल कनेक्शन हा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. यामध्ये तुम्ही चांगले वाटणारे मित्र, कुटुंबातील सदस्य किंवा ओळखीच्या लोकांना भेटू शकता. भेटणे शक्य नसेल तर फोनवरच बोला यामुळे मन हलके होईल, हसाल व खिदळाल व टेन्शन विसरून जाल.

उन्हाळ्याच्या दिवसात जागोजागी उसाच्या रसवंत्या दिसू लागतात. उन्हाळ्यात थंडावा देणारे एकमेव असं हे उत्तम पेय आहे.

मात्र, हे पेय केवळ थंडावाच देत नाही. तर काही समस्यांवर देखील एक उत्तम उपाय आहे. चाल तर जाणून घेऊया उसाच्या रसाचे फायदे.

## त्वचेसाठी उत्तम उपाय

अल्फा हायड्रोक्सी ॲसिड आणि ग्लायकोलिक ॲसिडचे प्रमाण असल्याने उसाचा रस त्वचेसाठी उत्तम आहे. यामुळे पिंपल्सची समस्या नाहीशी होते. त्वचेवरील डाग आणि सुरकुत्या नाहीशा होतात.

## तोंडाच्या दुर्गंधीपासून मुक्तता

उसाच्या रसामध्ये ॲटिबॅक्टेरिअलचे प्रमाण असल्याने तोंडाच्या दुर्गंधीपासून मुक्तता मिळते. दातांना इन्फेक्शनपासून बचाव होतो आणि दात निरोगी राहतात.

## थकवा दूर होतो

ऊसाच्या रसात ग्लुकोजचे प्रमाण अधिक असते. ग्लुकोज आणि इलेक्ट्रोलाइट्समुळे हे एक उत्तम एनर्जी ड्रिंक आहे. यामुळे ऊर्जा मिळते आणि ऊन लागण्यापासूनही बचाव होतो.

## कावीळसाठी फायदेशीर

उसाचा रस कावीळसाठी गुणकारी आहे. कावीळ झाल्यास उसाचा रस किंवा रोज सकाळी उस खाल्ल्यास कावीळ लवकर बरा होतो.

## मासिक पाळी

बऱ्याचदा मासिक पाळी येत नसल्यास सकाळ - संध्याकाळ उसाच्या रसाचे सेवन करावे. यामुळे मासिक पाळी येण्यास मदत होते.

## किडनीसाठी उत्तम

उसाचा रस खोकला, दमा, मूत्ररोग तसेच किडनीशी संबंधित रोगांवर रामबाण उपाय आहे. तसेच, उसाच्या रसामुळे यकृताचे कार्य सुधारण्यासही मदत होते.

# कावीळसह इतर समस्यांवर रामबाण उपाय





# 'हे' सुपरफूड भिजवून खाणे आरोग्यासाठी लाभदायक

आपल्याला बऱ्याचदा सांगितले जाते की, ताकद येण्यासाठी किंवा निरोगी राहण्यासाठी चणे, मूग ही कडधान्य भिजवून खावी. भिजवून खालेले पदार्थ आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. मात्र, ही कोणती सुपरफूड आहेत. ज्यामुळे तुम्हाला चांगला फायदा होतो? चला तर जाणून घेऊया अशी काही सुपरफूड जी भिजवून खाणे आरोग्यासाठी लाभदायक ठरते.

**मेथीचे दाणे -** तणाव कमी करण्यासाठी मेथीचे दाणे वापर उपयुक्त ठरतात. याशिवाय जर मेथीचे दाणे भिजवून सकाळी खाल्ले तर मधुमेहाच्या रुग्णांना ते खूप फायदेशीर ठरते. त्याचबरोबर ज्यांना बद्धकोष्ठतेची समस्या आहे त्यांच्यासाठी मेथीचे दाणे भिजल्याने आतडेही साफ होतात. मेथीचे दाणे खाल्ल्याने पाळीच्या काळात होत असलेल्या वेदना कमी होण्यासाठी फायदा होतो.

**खसखस -** खसखस भिजवून सकाळी गरम पाण्यासोबत खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होते. त्यात फोलेट थायमिन, व्हिटॅमिन बी असते जे चयापचय वाढवण्यास मदत करते.

**अळशी -** जर तुम्हाला हृदयासंबंधी काही आजार असल्यास अळशी एक रामबाण उपाय आहे. अळशी रात्रभर पाण्यात भिजवून त्याचे सेवन करावे. ओमेगा ३ हा फॅटी एसिडचा एकमेव शाकाहारी स्त्रोत आहे. जे खाल्ल्याने खराब कोलेस्ट्रॉल कमी होते.

**मनुका -** मनुके रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी त्याचे सेवन करावे. यामुळे पचनक्रिया सुधारते. ॲसिडिटीचा त्रास दूर होण्यास मदत होते. तसेच अशक्तपणा, मूत्रपिंडातील दगडही बरा होतो. याच बरोबर कोरडी द्राक्षेही दुधात भिजवून खाऊ शकतात. कोरड्या द्राक्षांमध्ये मॅग्नेशियम पोटॅशियम आणि लोहाचे प्रमाण जास्त असते. जे कर्करोगाच्या पेशी वाढण्यास प्रतिबंध करते.



# रोज सकाळी प्या 1 ग्लास डाळींबाचा ज्युस, होतील 'हे' फायदे!

डाळींब हे एक असे फळ आहे जे ऋतू कोणताही असो पण अगदी सहज उपलब्ध होते. हे फळ खाणा-या लोकांची संख्या भारतात खूप आहे, काही लोकांना डाळींबाचे दाणेच आवडतात तर काही लोकांना त्याचा ज्यूस करुन पिणं जास्त सोप्पं जातं. जरी यातील दाणे काढण्यासाठी किंबहुना दाणे व्यवस्थित सालीपासून वेगळे करण्यासाठी खूपच वेळ जात असला तरीही या फळाचे आपल्या आरोग्याला अनेक आश्चर्यकारक फायदे होतात. वैज्ञानिक अनुमानानुसार डाळींबाचा ज्यूस करुन प्यायल्याने त्यातील पोषक तत्वे लगेचच आपल्या शरीरात विरघळतात आणि आरोग्यास भरपूर लाभ देतात. तुम्हीही डाळींबाचे दाणे काढण्याच्या प्रकियेमुळे डाळींबच खाणं टाळत असाल तर थांबा...! आधी डाळींबाच्या सेवनाने होणारे हे फायदे जाणून घ्या.



## रक्तातील साखरेची पातळी ठेवते नियंत्रित

रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहिल्यास आपल्याला मधुमेहापासून असलेला धोका टळतो. रक्तातील साखर वाढल्यास आपल्या शरीराला अनेक गंभीर आजार विळखा घालू शकतात. तसेच याचा परिणाम रक्ताभिसरण कार्यावर देखील होऊ शकतो. पण डाळींबाचा ज्यूस प्यायल्याने रक्तातील साखरेची पातळी आपण नियंत्रित ठेवण्यास भरपूर मदत मिळते. त्यामुळे तुम्ही मधुमेहापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी दररोज सकाळी डाळींबाचा ज्यूस अवश्य घेऊ शकता. यामुळे तुमचे रक्त शुद्ध राहून कोणताही आजार शरीरास सहजासहजी जडणार नाही.

## उच्च रक्तदाबापासून करते संरक्षण

सध्याच्या स्थितीत बऱ्याच जणांना उच्च रक्तदाबाची समस्या आढळून येते. आपल्या भारतात तर अब्जावधी लोकांच्या मृत्युचे कारण हे उच्च रक्तदाब असतो. पण तुम्हाला या त्रासातून जायचं नसेल तर तुम्ही दररोज डाळींबाचे सेवन करणे अत्यावश्यक आहे. कारण डाळींबामध्ये असणारी मॅग्नेशियमची मात्रा ही उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास खूपच प्रभावी मानली जाते. त्यामुळे ज्या लोकांना रक्तदाबाची समस्या आहे किंवा ज्यांना या समस्येपासून दूरच राहायचं आहे अशा लोकांनी डाळींबाचा ज्यूस पिण्यास सुरुवात करावी.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह प्रलंबित विविध १८ मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप आंदोलनाच्या चौथ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी मागे घेण्यात आला. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत झालेल्या बैठकीत दिलेल्या आश्वासनांचे इतिवृत्त मिळाल्यानंतर तसेच सकारात्मक आश्वासनानंतर संप मागे घेण्याचा निर्णय समन्वय समितीकडून घेण्यात आला. सरकारी कर्मचारी आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारला होता. या संपामुळे राज्यातील महसूल विभागाच्या कार्यालयावर सर्वाधिक परिणाम झाला. मुद्रांक नोंदणीसह जमीन तसेच घर खरेदी व्यवहार, विवाह नोंदणीचेही काम ठप्प झाले होते. अखेर चौथ्या दिवशी या संपावर तोडगा काढण्यात राज्य सरकारला यश आले.



मुख्य सचिवांच्या सोबत झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या आश्वासनांबाबतचे इतिवृत्त मिळावे, ही मागणी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीची होती. त्यानुसार आज याविषयीचे इतिवृत्त मिळाल्यानंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

सरकारने आमच्या मागण्यांवर सकारात्मक विचार केला आहे. सुधारित निवृत्ती वेतन योजनेबाबतही सरकारने आश्वासन दिले असून त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातील जनतेची कामे ठप्प होऊ नयेत, सरकारी सेवांवर परिणाम होऊ नये म्हणून हा संप मागे घेण्याचा निर्णय झाला. यासंदर्भात झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत सर्व संघटनांनी या निर्णयाला पाठींबा दिल्यानंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले.

# कल्याण शहरात अनधिकृत बॅनरवर बंदी... नियमभंग झाल्यास केडीएमसीकडून कारवाईचा इशारा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने अनधिकृत बॅनर, फ्लेक्स आणि पोस्टर्स लावणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा दिला आहे. कल्याण पूर्वेतील ५/डी विभागात याबाबत अंतिम नोटीस जारी करण्यात आली असून नियमांचे उल्लंघन केल्यास गुन्हा दाखल केला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### अनधिकृत बॅनर लावल्यास गुन्हा

महानगरपालिकेकडून सांगण्यात आले आहे की, सार्वजनिक ठिकाणी परवानगीशिवाय बॅनर, फ्लेक्स किंवा पोस्टर्स लावणे हा गंभीर गुन्हा आहे. यावर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायदा, १९९५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका कायदा, १९४९ अंतर्गत कारवाई केली जाईल.

### परवानगीशिवाय जाहिरात नाही

कोणतेही साईनबोर्ड किंवा जाहिरात लावण्यासाठी महानगरपालिकेच्या स्काय साईन आणि परवाना विभागाची लेखी परवानगी घेणे आणि ठराविक शुल्क भरणे अनिवार्य आहे.

**कुठे लावण्यास बंदी?**
महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की, खालील ठिकाणी बॅनर किंवा जाहिराती लावण्यास मनाई आहे:
- सार्वजनिक रस्ते
- डिव्हायडर
- पदपथ (फुटपाथ)
- वीज खांब
- सिग्नल
- पूल
- झाडे




### वाढदिवस, लग्न, राजकीय कार्यक्रमांनाही नियम लागू

ही कारवाई वाढदिवस, लग्न, क्लासेस, शुभेच्छा, राजकीय कार्यक्रम यांसाठी लावल्या जाणाऱ्या बॅनरवरही लागू होणार आहे, जर ते परवानगीशिवाय लावले असतील.

### वाहतूक धोक्याचाही इशारा

अशा बॅनरमुळे शहराचं रूप बिघडतं आणि वाहनचालकांचं लक्ष दुसरीकडे वळल्याने अपघाताचा धोका वाढतो, असे महानगरपालिकेकडून सांगण्यात आले आहे.

### प्रिंटिंग प्रेससाठीही नियम

प्रिंटिंग प्रेस मालकांनी बॅनर किंवा पोस्टर छापण्यापूर्वी ग्राहकाकडे महानगरपालिकेची परवानगी आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक बॅनरवर प्रिंटिंग प्रेसचे नाव आणि पत्ता नमूद करणे बंधनकारक आहे.

### काय शिक्षा होऊ शकते?

कायद्यानुसार, अनधिकृत बॅनर लावल्यास ३ महिन्यांपर्यंत कारावास, २,००० रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

### एफआईअर आणि खर्च वसुली

महानगरपालिका अनधिकृत बॅनर हटवू शकते, संबंधितांवर एफआईअर दाखल करू शकते आणि बॅनर काढण्याचा खर्चही संबंधितांकडून वसूल करू शकते.

महानगरपालिकेने ही अंतिम नोटीस असल्याचे स्पष्ट करत, कोणत्याही दबावाला बळी न पडता नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

## मराठीसाठी मोटार वाहन कायद्यात सुधारणा

# प्रस्ताव गृहविभागाला सादर

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णयाच्या दिशेने पाऊल टाकले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, ७८ आणि ८५ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्याअंतर्गत वाहनचालकांसाठी मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान अनिवार्य करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. दरम्यान, परिवहन आयुक्तांनी या संदभार्तील प्रस्ताव गृह विभागाला सादर केला आहे. त्यानुसार मसुदा अधिसूचना काढण्याची प्रक्रिया सुरू आहे.



प्रस्तावित बदलांनुसार, सार्वजनिक सेवा वाहन चालवण्याची परवानगी देताना अर्जदाराच्या चारित्र्य व पार्श्वभूमीबरोबरच मराठीचे ज्ञान तपासण्याचा अधिकार परवाना प्राधिकरणाला आहे. सार्वजनिक सेवा वाहन चालवण्याची परवानगी देताना मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान तपासले जाणार आहे. मीटर असलेल्या वाहनांसाठी परवान्यांच्या अतिरिक्त अटींमध्ये टॅक्सी, रिक्षा, ओला, उबर, चालकांच्या परवाना नूतनीकरणाच्या वेळी मराठीचे ज्ञान बंधनकारक करण्यात आले आहे.

## जुना करार संपला, नव्याची परवानगी नाही

# एसटीमध्ये डिझेलची टंचाई, राज्यात वाहतूक विस्कळीत

■मुंबई। प्रतिनिधी,

एकीकडे डिझेल खरेदीचा जुना खरेदी करार संपला तरी नव्या खरेदीची परवानगी आलेली नसल्याने एसटी महामंडळात प्रचंड गोंधळ माजला आहे. इंधनावरच्या खर्चात कपात करण्यासाठी गुजरातमधून डिझेल खरेदी करण्याचा निर्णय अलिकडे महामंडळाने घेतला आहे. पण राज्य सरकारच्या अर्थ खात्याने त्याला परवानगी दिली नाही. परिणामी इकडे डिझेलअभावी राज्यातील ५५ आगारातील वाहतूक विस्कळीत झाली आहे. यामुळे प्रवासी व चालक या दोघांनाही त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केला आहे.

एसटीला दररोज सरासरी १० लाख ८७ हजार लिटर इतके डिझेल लागते. इंधनावर वषार्ला सरासरी ३ हजार ४०० कोटी खर्च होत आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातमध्ये मूल्यवर्धित कर कमी असल्याने तिथून खरेदी करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला



होता. त्यासाठी निविदा काढण्यात आली होती व अर्थ खात्याकडे गुजरातमधून डिझेल खरेदी करण्याची परवानगी मागितली होती. पण अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांनी त्याला अद्यापी हिरवा कंदील दाखवलेला नाही.

दरम्यान पूवीर्ची पुरवठादार कंपनी बीपीसीएलचा करार संपल्याने त्यांनी एक महिन्यापासून डिझेल देणे बंद केले असून परिणामी फेऱ्या उशिरा जात आहेत. त्याचा परिणाम प्रवासी उत्पन्नावर झाला असून हंगामी भाडेवाढ करूनही अपेक्षित उत्पन्न मिळालेले नाही. साधारण १५ टक्के प्रवासी उत्पन्नाला त्याचा फटका बसला असून ऐन हंगामात एसटीचे आर्थिक नुकसान झाले आहे. याला निव्वळ राज्य सरकारचे अर्थ खाते जबाबदार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात मध्यस्थी करून तात्काळ उचित निर्णय घ्यावा अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी यांनी केली आहे.

एसटीकडे एकूण २५१ डिझेल पंप असून त्यातील १९६ आयओसीचे व ५५ बीपीसीएलचे आहेत. बीपीसीएलचे कंत्राट संपल्याने ५५ डिझेल पंप गेले महिनाभर बंद आहेत. ज्या आगारातील पंप बंद आहेत, तिथल्या गाड्यांना दुसऱ्या आगारात डिझेल भरण्यासाठी जावे लागत आहे. गाड्या वाढल्याने मोठ्या रांगा लागत आहेत. गाडी घेऊन चालकांना तासनतास रांगेत राहून डिझेल भरावे लागत आहे. या प्रकारामुळे ऐन उन्हाळ्यात चालकांना शारीरिक व मानसिक ताण त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचेही बरगे यांनी म्हटले आहे.

# वसईतील जलस्त्रोतांचे अस्तित्व धोक्यात



■वसई। प्रतिनिधी,

वसई परिसरातील तलाव आणि नैसर्गिक जलसाठ्यांवर होत असलेल्या बेकायदेशीर भरावामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे. वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले असून संबंधित अधिकाऱ्यांना माहिती सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वसई परिसरात गेल्या काही वर्षात झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणामुळे नैसर्गिक जलस्त्रोतांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. शतकानुशतके अस्तित्वात असलेले तलाव आणि बावखळे हे भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी आणि किनारपट्टी भागातील जमिनीतील क्षारता रोखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र सध्या या जलस्त्रोतांवर बेकायदेशीरपणे माती टाकून भराव केला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

या गंभीर प्रकाराची दखल घेत वसई तहसीलदार कार्यालयाने अधिकाऱ्यांना परिसरातील तलाव आणि बावखळ्यांबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्या ठिकाणी भराव करण्यात आला आहे त्यामागील जबाबदार कोण आहेत याची माहिती गोळा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पर्यावरणप्रेमींच्या म्हणण्यानुसार, काही भू माफिया शासकीय सुट्ट्यांचा फायदा घेत शुक्रवार ते रविवार या कालावधीत जाणीवपूर्वक भराव करतात. त्यानंतर त्या जागांवर अतिक्रमण करून बांधकामे केली जातात. त्यामुळे नैसर्गिक जलसाठे नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तलाव आणि बावखळे नष्ट झाल्यास भविष्यात वसई परिसरात पूरस्थिती अधिक गंभीर होऊ शकते तसेच गोड्या पाण्याचे स्त्रोत कायमचे संपुष्टात येण्याची शक्यता आहे. भूजल पातळी आणखी खालावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सामाजिक कार्यकर्ते मिलिंद खानोलकर, डॉमिनिका डाबरे आणि मॅकेन्झी डाबरे यांनी या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली आहे. बेकायदेशीर भराव करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून बुजवलेले जलस्त्रोत पूर्ववत करण्यात यावेत अशी मागणीही जोर धरत आहे. तसेच पर्यावरण संरक्षणासाठी केवळ कागदोपत्री निर्णय न घेता प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# ४१ वर्षीय व्यक्तीकडून मुलीवर १ वर्षे अत्याचार, आईला कळताच मानसिक धक्का बसला अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

पैशांसह चॉकलेटचे आमिष दाखवून एका दहा वर्षांच्या मुलीवर तिच्याच परिचित 41 वर्षांच्या आरोपीने विनयभंगासह लैगिंक अत्याचार केल्याची घटना गोरेगाव परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि पोक्सोच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल होताच तापस नावाच्या आरोपीला दिडोंशी पोलिसांनी अटक केली आहे.

अटकेनंतर त्याला विशेष सत्र न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. प्राथमिक तपासात आरोपी पिडीत मुलीवर गेल्या एक वर्षांपासून लैगिंक अत्याचार करत असल्याचे उघडकीस आले आहे. दोन दिवसांपूर्वीच उघडकीस आलेल्या या घटनेने स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

४१ वर्षांची तक्रारदार महिला ही गोरेगाव परिसरात राहत असून दहा वर्षांची पिडीत तिची मुलगी आहे. याच परिसरात तापस नावाचा आरोपी राहत असून ते एकमेकांच्या परिचित आहेत. १ एप्रिल २०२५ रोजी पिडीत मुलीला आरोपीने पैशांसह चॉकलेटचे आमिष दाखवून त्याच्या घरी आणले. तिच्याशी जवळीक निर्माण करुन तिच्याशी अश्लील चाळे केले होते. एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत त्याने अनेकदा तिच्याशी अश्लील चाळे करुन तिचा विनयभंग तसेच लैगिंक अत्याचार केला होता. हा प्रकार कोणालाही सांगू नये म्हणून तो तिला धमकावत होता.

अलीकडेच हा प्रकार पिडीत मुलीकडून तिच्या तक्रारदार आईला समजला होता, ही माहिती ऐकल्यानंतर तिला प्रचंड मानसिक धक्का बसला होता. त्यामुळे तिने तापसविरुद्ध दिडोंशी पोलीस ठाण्यात तक्रार केली होती.

या तक्रारीची वरिष्ठ पोलीस अधिकार्यांनी गंभीर दखल घेत आरोपीविरुद्ध कारवाईचे आदेश दिले होते. या आदेशांनतर तापस याच्याविरुद्ध पोलिसांनी विनयभंगासह लैगिक अत्याचार आणि पोक्सोच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच त्याला सोमवारी पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला दिडोंशीतील विशेष सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.



# मोबाईल स्टेट्सवर अखेरचा मेसेज अन् त्यानंतर जे घडलं त्याने काळजाचा थरकापच उडाला

■पुणे। प्रतिनिधी,

Everyone Sorry असं स्टेट्स ठेवलं आणि पुण्यातील २७ वर्षीय तरुण अचानक गायब झाला. कुटुंबीयांची तरुणाला शोधण्यासाठी एकच धावाधाव झाली मात्र दिन दिवसांनी सापडला तो तरुणाचा मृतदेह. पुण्यातील खडकी येथे ही धक्कादायक घटना समोर आली आहे.

पुण्यातील खडकीतील अमर राजेंद्र कदम (वय 27) हा युवक गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होता. याबाबत खडकी पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलीस तपासात साईव खुर्द परिसरातील वरसगाव धरणाच्या बॅकवॉटर भागात त्याचे ओळखपत्र, कपडे, मोबाईल आदी वस्तू आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. प्राथमिक पाहणीत संबंधित ठिकाणी पाण्याचा खोल प्रवाह असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तातडीने शोधमोहीम राबविण्यात आली.



**नेमकं प्रकरण काय?**
अमर राजेंद्र कदम (वय 27) हा युवक पुण्यातील खडकी येथून गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होता. दरम्यान या युवकाचा राजगड तालुक्यातील वरसगाव धरणाच्या बॅकवॉटरमध्ये मृतदेह आढळला. हा तरुण गायब झाल्यानंतर खडकी पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल होताच पोलिसांनी शोधाशोध केली, दरम्यान तरुणाचा मृतदेह आढळून आला. या घटनेने कुटुंबावर एकच शोककळा पसरली आहे.

साईव खुर्द परिसरातील वरसगाव धरणाच्या बॅकवॉटर भागात त्यांचे ओळखपत्र, कपडे, मोबाईल आदी वस्तू आढळून आल्याने हवेली आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आलं होतं. त्यानंतर या टीमने खोल पाण्यात शोध घेतला. यावेळी त्याचा मृतदेह आढळून आला. त्याने आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्याने 'Everyone Sorry' असा स्टेटस मोबाईलवर ठेवला असल्याची माहितीही समोर आली आहे. यावरून अमरने आत्महत्या करण्याचा निर्णय घेऊनच आत्महत्या केल्याचं सांगितलं जात आहे. पण त्याच्या आत्महत्या करण्यामागचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. अधिक तपास पोलिसांकडून सुरु आहे.

# 'सी माय ब^%$#... हिंदू मुलींना आता'... 'ते' फोटो पाठवून अशरफचे तरुणीला अश्लील मेसेज

**वारंवार कॉल, फोटो व व्हिडिओ पाठवून त्रास**
तक्रारीनुसार, आरोपीने दि. 22 एप्रिल रोजीही वारंवार कॉल आणि मेसेज करून त्रास देणे सुरूच ठेवले. त्याने काही मुलींचे फोटो पाठवत त्यांच्यासोबत संबंध ठेवल्याचा दावा केला. तसेच स्वतःचा अश्लील फोटो पाठवून ह्वसी माय बनानाह्व असा मेसेज केला. संबंधित फोटो पाहिल्यानंतर त्याने तो लगेच डिलीट केला, मात्र तरुणीने चॅटचे स्क्रीनशॉट जतन करून ठेवले आहेत. याशिवाय आरोपीने तिला अनेक अश्लील व्हिडिओ पाठवले आणि अयोग्य मागण्या केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही. त्याने 'आता हिंदू मुलींना मुस्लिम मुलं आवडतात', असा देखील मेसेज केलाय. त्यानंतर तरुणीने तिच्या ओळखीतील दोन सहकारी मैत्रिणींशी संपर्क साधला असता, त्यांनाही अशाच प्रकारचे मेसेज आणि कॉल आल्याचे समोर आले. त्यांनी आरोपीचा नंबर ब्लॉक केल्याचे सांगितले. मात्र, आरोपीकडून अश्लील मेसेज येणे दि. 23 एप्रिलपर्यंत सुरूच राहिल्याने तरुणीने वडिलांसह पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 75, 78(2), 79 तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 च्या कलम 67(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

■वसई। प्रतिनिधी,

मुंबईतील एका 19 वर्षीय तरुणीला व्हॉट्सॲपद्वारे अश्लील मेसेज आणि कॉल करून त्रास दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित तरुणी आपल्या कुटुंबासोबत मुंबईत राहते. पीडित तरुणी फेब्रुवारी 2026 मध्ये एका कन्स्ट्रक्शन कंपनीत टेलीकॉलर म्हणून कामाला रुजू झाली होती. सुमारे 15 दिवसांनी साइट बंद झाल्यामुळे तिने नोकरी सोडली होती. त्याच ठिकाणी काम करणाऱ्या काही सहकाऱ्यांशी तिची ओळख झाली होती. नोकरी सोडल्यानंतर त्या कंपनीतील अशरफ नावाच्या तरुणाने तिला अश्लील मेसेज करुन त्रास दिल्याचा तसेच शारिरीक संबंधाची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. या प्रकरणी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा करण्यात आलाय.


संबंधित पीडित तरुणीला दि. 21 एप्रिल 2026 रोजी सकाळी सुमारे 11.15 वाजता तिच्या मोबाईलवर अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप मेसेज आला. चौकशी केल्यानंतर संबंधित व्यक्तीने स्वतःचे नाव अशरफ असल्याचे सांगितले आणि तो तिच्या पूर्वाश्रमीच्या कंपनीत काम करत असल्याचेही नमूद केले. त्यानंतर त्याने सतत मेसेज करून तरुणीला 'क्युट' असल्याचे सांगत संपर्क वाढवण्याचा प्रयत्न केला. काही वेळातच त्याने व्हॉट्सॲप कॉल करून अश्लील भाषेत संवाद साधण्यास सुरुवात केली. तरुणीने हा संवाद शेजारील मुलाच्या मोबाईलवर रेकॉर्ड करून ठेवला असून, आरोपीने तिच्यासोबत लॉजवर जाऊन लैंगिक संबंध ठेवण्याची तसेच ओरल सेक्सची मागणी केल्याचे नमूद केले आहे.



# नाशिक टीसीएसमध्ये नेटचा पासवर्डही अश्लील भाषेत

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेज युनिटमध्ये कथित धर्मांतरण आणि महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाप्रकरणात हादरवणारे खुलासे समोर येत आहे. पीडितांच्या जबाबातून कंपनीत इतके भयानक प्रकार सुरू असताना युनिट हेड आणि व्यवस्थापन काय करत होते असा सवाल करण्यात येत आहे. दरम्यान, 'एसआयटी'ने टीसीएस कंपनीतील गंभीर गुन्ह्याप्रकरणी चौथ्या पीडितेचा जबाब घेतला असून या पीडितेची राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्यांनी देखील भेट घेतली. विशिष्ट धमार्चा ग्रंथ हेतुपुरस्कर वाचण्यास सांगणे, गोमांस खाण्यास बळजबरी करणे, महिलांना धमकावणे, अश्लील भाषेचा प्रयोग




करणे, कृत्य करणे असे काही संतापजनक प्रकार कंपनीत होत असल्याचे कंपनीतील पीडित कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. आता कंपनीतील आणखी एक खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. कंपनीत स्थानिक पातळीवरील नेटचे पासवर्ड देखील अश्लील भाषेत दिले जात होते. यातून अनेकदा धार्मिक भावना देखील दुखावल्या जात होत्या, अशी आपबिती एका पीडितेने सांगितली. पीडितेने सांगितले की, ती तीन वर्षांपूर्वी कंपनीत ट्रेनी कर्मचारी म्हणून लागली होती. तेव्हा रजा मेनन याने तिचा छळ केला, तिच्याशी तो अश्लील भाषेत संभाषण करू लागला.

याविषयी तिने ऑपरेशन मॅनेजर आश्विनी चैनानी हिच्याकडे तोंडी तक्रार केली मात्र तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले गेले, मात्र यामुळे चिडलेल्या रजा याने अटकेतील आरोपी दानिश, तसेच तौसिफच्या सोबतीने तिचा अधिक छळ सुरू केला. डिजिटल पाठलाग केला, तसेच कंपनीत तिच्याबाबत नको ती अफवा पसरविली असा जबाब पीडितेने दिला आहे. रजा हा ट्रेनी केबिनमध्ये प्रवेश करून अश्लील बोलायचा. तसेच पदाचा दुरुपयोग करून कामावरून काढून टाकण्याचा दम द्यायचा, असा जबाब फियार्दीने दिलाय. व्हॉट्सॲपवर रात्री उशिरा तू काय करतेय, रात्री काय करते वैगेरे नको ते प्रश्न विचारून मानसिक छळ करायचा असा जबाब देखील संबंधित पीडितेने दिला आहे.

टीसीएस कंपनीतील धर्मांतराचा प्रयत्न तसेच लैंगिग अत्याचारप्रकरणी अटकेत असलेला प्रमुख संशयित आरोपी दानिश एजाज शेख याचा अंतरिम जामीन जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लावत अटकपूर्व जामिनासाठी पुढील सुनावणी २७ एप्रिल रोजी घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे दानिशचा कारागृहातील मुक्काम वाढला आहे.दानिशवर धार्मिक भावना दुखावणे तसेच महिलेशी गैरवर्तन केल्याचे आरोप असून, त्याच्यावर दाखल एकूण नऊ गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने आरोपीला दिलासा देण्यास नकार दिला असल्याची माहिती सरकारी अभियोक्ता किरण बेंडभर यांनी दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com